cmyk

## संपादकीय

### ढासळती शिक्षण व्यवस्था आणि तरुण भारताची वेदना

भारतातील शिक्षण व्यवस्था आज एका गंभीर वळणावर उभी आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी थेट संबंधित असलेल्या परीक्षा, प्रवेशप्रक्रिया आणि उच्च शिक्षणाच्या संधी यांबाबत निर्माण झालेला अविश्वास दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच विद्यार्थ्यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी रस्त्यावर उतरल्यावर संवादाऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जात असेल, तर तो लोकशाहीसाठी धोक्याचा इशारा मानावा लागेल.

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१२५ | शनिवार दि.२५ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### बांगलादेश राष्ट्रपतींचा तडकाफडकी राजीनामा

ढाकाः बांगलादेशाच्या राजकारणात मोठी घडामोड घडली असून राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या अचानक झालेल्या राजीनाम्यामुळे देशाच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. संविधानातील कलम ५० (३) नुसार राष्ट्रपतींनी आपला राजीनामा संसदेच्या सभापतींकडे सादर केला. अधिकृतरीत्या त्यांनी आरोग्याच्या कारणास्तव पदाचा राजीनामा दिल्याचे नमूद केले आहे. मात्र, त्यांच्या या निर्णयामागे माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्याशी संपर्क साधल्याच्या चर्चाही रंगल्या आहेत. मे महिन्यात लंडन दौऱ्यावर असताना मोहम्मद शहाबुद्दीन यांनी शेख हसीना यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्याचा दावा केला जात आहे. त्यानंतर त्यांच्या विरोधात राजकीय दबाव वाढल्याची चर्चा सुरू झाली होती. या पार्श्वभूमीवर त्यांच्या राजीनाम्याची मागणीही काही दिवसांपासून होत होती.

### अमेरिकेकडून १० टक्के टॅरिफ लागू

न्युयॉर्कः अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह १७ देशांवरील आयातीवर १० टक्के नवीन टॅरिफ लागू करण्याची घोषणा केली आहे. हा निर्णय अमेरिकेच्या सेक्शन ३०१ अंतर्गत करण्यात आला असून, सक्तीच्या मजुरीतून तयार होणाऱ्या वस्तूंवरील बंदी प्रभावीपणे लागू न करणाऱ्या देशांवर ही कारवाई करण्यात आली आहे. भारतासह पाकिस्तान, बांगलादेश, मलेशिया, मेक्सिको, श्रीलंका आणि ब्रिटन यांचाही या यादीत समावेश आहे. अमेरिकेच्या मते हा निर्णय मानवाधिकार आणि निष्पक्ष व्यापार धोरणांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक आहे. या टॅरिफमुळे भारतीय वस्तूंची अमेरिकेतील किंमत वाढू शकते आणि निर्यातदारांवर अतिरिक्त आर्थिक दबाव येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### हे फक्त नीट पुरतं मर्यादित नाही – संजय मांजरेकर

मुंबईः वैद्यकीय प्रवेश परीक्षा मधील पेपरफुटी आणि गैरप्रकारांविरोधात 'कॉकरोच जनता पार्टी' आणि लाखो विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या आंदोलनाचे लोण आता संपूर्ण देशभरात पसरले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या या विद्यार्थ्यांना पोलिसांच्या लाठीमाराचा सामना करावा लागल्यानंतर, आता क्रीडा विश्वातून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. सचिन तेंडुलकर आणि शुबमन गिल यांच्यानंतर आता माजी क्रिकेटपटू संजय मांजरेकर यांनी विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ थेट मैदानात उतरत सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. संजय मांजरेकर यांनी 'एक्स'वर पोस्ट करत लिहिले, ''मी भारतातील तरुणांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. त्यांना दाबू नका, त्यांना आकाशात गगनभरारी घेऊ द्या. हेच तरुण भारताला नव्या उंचीवर नेतील.'' ''हा लढा केवळ नीट पेपरफुटीपुरता मर्यादित नसून, लोकशाहीत होणाऱ्या दडपशाही आणि मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांकडून होणाऱ्या 'ब्रेनवॉशिंग'विरोधात उठलेला आवाज आहे. दोन मुलांचा बाप म्हणून मला चांगला अनुभव आहे; आजच्या तरुण पिढीला दाबण्याचे प्रयोग कधीही यशस्वी होणार नाहीत.''

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| गहू: १६.०० क्विंटल | | |
| २,६०० | २,६८९ | २,६५७ |
| ज्वारी/हायब्रिड :९५.५० क्विंटल | | |
| २,४६० | ४,७०० | ३,२९० |
| मका/लोकल: २०.०० क्विंटल | | |
| २,३२३ | २,३२३ | २,३२३ |
| तूर : २.०० क्विंटल | | |
| ७,६०१ | ७,६०१ | ७,६०१ |
| उडीद : २.०० क्विंटल | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी:११.५० क्विंटल | | |
| १,९८१ | २,६६३ | २,४२२ |
| मुग: ४१.५० क्विंटल | | |
| ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | | |
| ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ७.५० क्विंटल | | |
| ५,५०१ | ५,७७१ | ५,६३६ |

# पहिल्या टप्प्यात १७ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी

## ३१ जुलैपूर्वी खात्यात पैसे जमा होणार, गावागावातल्या याद्या तयार–मुख्यमंत्री

सोलापूर । प्रतिनिधी

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम सुरु झाले आहे. सहकार विभागाने १७ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर केली आहे. त्यांना १३ हजार कोटी रुपये देत आहोत. आता दुसऱ्या यादीचे काम सुरु आहे. पहिल्या यादीतील जे शेतकरी आहेत; त्यांच्या गावांमध्ये कर्जमाफीच्या याद्या जात आहेत. त्याची तत्काळ पडताळणी करुन ३१ तारखेपूर्वीच १७ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**

शुक्रवारी सोलापूर जिल्ह्यातील सात शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यात आले. त्यांना कर्जमुक्त केले. त्यांना आता नवीन कर्ज घेण्यासाठी पात्र केले. आज त्यांना कर्जमुक्तीचे प्रमाणपत्रही देण्यात आले आहे. तसेच त्यांना नवीन कर्जाचे वाटपदेखील केले. सर्व जिल्ह्यांमध्ये असे कार्यक्रम करु, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पंढरपूर येथे शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा कृतज्ञता शेतकरी मेळावा आणि सत्कार कार्यक्रमात बोलताना त्यांनी कर्जमुक्ती योजनेच्या प्रक्रियेची माहिती दिली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक कृषी पंढरी - २०२६ कृषी महोत्सवाचेही उदघाटन केले. राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार आहे. ज्यांनी नियमित कर्ज भरले त्यांच्यासाठी ५० हजार रुपये त्यांच्या खात्यात जमा करत आहोत. बँकाडून आलेल्या सर्व आकडेवारीची पडताळणी करावी लागते. त्याला थोडा वेळ लागतो. आम्ही कर्जमाफीच्या योजनेत एकही शेतकरी मागे राहू देणार नाही. सर्व शेतकऱ्यांना ▶▶ पान २ वर

### सर्व शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज मिळणार

एकीकडे शेतकऱ्याला कर्जमाफी दिली. तर दुसरीकडे त्याचे विजेचे बिलही माफ केले. त्याच्यापोटी दरवर्षी २४ ते २५ हजार कोटी रुपये राज्य सरकार आपल्या तिजोरीतून वीज महामंडळाला देत आहे. राज्यातील ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देत आहोत. पुढच्या काळामध्ये डिसेंबर किंवा मार्चपर्यंत १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज द्यायची आहे. आधी ८ तास, मग १० तास आणि नंतर १२ तास वीज देऊ. शेतकऱ्यांना अखंडित वीज मिळायला पाहिजे, यासाठी आम्ही काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.



## पेपरफुटीविरोधात केंद्र सरकारचा मोठा निर्णय!

### दोषींना १० वर्षांचा तुरुंगवास; १० कोटी दंड, ३ महिन्यांत निकाल

दिल्ली । प्रतिनिधी

**देशभरात आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटीच्या घटनांमुळे निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी य३ांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पेपरफुटीविरोधी सुधारित विधेयकाला मंजुरी देण्यात आली आहे. या विधेयकानुसार पेपरफुटीच्या गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्यांना १० वर्षांपर्यंतचा तुरुंगवास, १० कोटींपर्यंत दंड आणि फास्ट ट्रॅक कोर्टाकडून तीन महिन्यांत निकाल देण्याची तरतूद करण्यात आली आहे.**

सुधारित विधेयकात पेपरफुटी करणाऱ्या टोळ्या आणि संबंधित गुन्हेगारांविरोधात कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकरणांची सुनावणी विशेष फास्ट ट्रॅक न्यायालयांमध्ये होणार असून, न्यायालयांना तीन महिन्यांच्या आत तपास पूर्ण करून निकाल देण्याचे अधिकार दिले जाणार आहेत. सरकारच्या मते, या कायद्यामुळे स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल आणि परीक्षेची पारदर्शकता वाढेल. शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटी, कॅबिनेट कमिटी ऑन इकॉनॉमिक अफेयर्स आणि त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत विविध परिक्षांच्या संदर्भात अधिक कठोर करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. सरकार पुढील आठवड्यात सुरू होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात हे सुधारित विधेयक सादर करण्याची तयारी करत आहे. यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेपरफुटीच्या घटनांवर भाष्य करत ''पेपर लीक ही साधी घटना नाही. हा लाखो विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबांच्या भविष्याशी संबंधित विषय आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्यासाठी सरकार नवीन कायदा आणणार आहे,'' असे म्हटले होते. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीच्या प्रतिनिधी आणि केंद्र सरकारच्या मंत्र्यांमध्ये नवी दिल्लीतील ▶▶ पान २ वर

पांडूरंगा चरणी...!

राज्य लोकतंत्र

## लाडकी बहीण योजनेची अंतिम यादी जाहीर !

### १.६६ कोटी महिला पात्र, ८०.७१ लाख अर्ज अपात्र, सर्व प्रकारची पडताळणी पूर्ण



मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची ई–केवायसी आणि सर्व प्रकारची पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, राज्यातील पात्र लाभार्थी महिलांची अंतिम संख्या १ कोटी ६६ लाख २८ हजार ४८ इतकी निश्चित करण्यात आली आहे. पडताळणीनंतर पात्र ठरलेल्या सर्व महिलांच्या बँक खात्यात जून महिन्याचे अनुदान जमा करण्यात आले आहे.

योजना सुरू झाल्यानंतर राज्यभरातून सुमारे २ कोटी ४७ लाख महिलांनी अर्ज केले होते. मात्र, अर्ज आणि कागदपत्रांची सखोल तपासणी केल्यानंतर ८० लाख ७१ हजार ९५२ महिला अपात्र ठरल्या आहेत.

पडताळणीदरम्यान सुमारे २४ लाख महिलांनी चुकून स्वतःची नोंद शासकीय कर्मचारी अशी केली होती. त्यामुळे त्या सुरुवातीला अपात्र ठरल्या. मात्र, सरकारने ही चूक दुरुस्त करण्यासाठी चार महिन्यांची मुदत दिली. या कालावधीत २४ लाखांपैकी २० लाख महिलांनी आपली माहिती दुरुस्त केली आणि त्या पुन्हा पात्र ठरल्या. उर्वरित ४ लाख महिला मात्र निकष पूर्ण न केल्याने अपात्र राहिल्या.

पडताळणीपूर्वी या योजनेसाठी राज्य सरकारला दरवर्षी सुमारे ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागत होती. आता लाभार्थ्यांची अंतिम संख्या निश्चित झाल्यामुळे सरकारचा महिन्याचा खर्च २ हजार ४५९ कोटी रुपये इतका राहणार असून, त्यामुळे वार्षिक सुमारे १२ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याचे सांगण्यात आले. सरकारने स्पष्ट केले आहे की, इतर कल्याणकारी योजनांप्रमाणेच या योजनेतील लाभार्थ्यांचीही वेळोवेळी पडताळणी केली जाणार आहे. योजनेच्या नियमांनुसार ६५ वर्षे पूर्ण झालेल्या महिलांचे नाव आपोआप ▶▶ पान २ वर

## विद्यार्थ्यांवर लाठीमार करणाऱ्यांवर कारवाई का नाही?

### दिल्ली आंदोलनावरून राज ठाकरेंचा सरकारला थेट सवाल



मुंबई । प्रतिनिधी

दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. विद्यार्थ्यांवर पोलिसांकडून करण्यात आलेल्या कथित बळाच्या वापरावर त्यांनी नाराजी व्यक्त करत, ''शाळेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मारहाण केली तर त्यांच्यावर कारवाई होते, मग आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमार करणाऱ्या पोलिसांवर आणि तसे आदेश देणाऱ्यांवर कारवाई का होत नाही?'' असा सवाल केला आहे. ▶▶ पान २ वर

## जंतर-मंतर लाठीचार्ज प्रकरणात सुप्रीम कोर्टाची एन्ट्री

### २७ जुलैला होणार महत्त्वाची सुनावणी



दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्लीतील जंतर–मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्ज प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्यास सुप्रीम कोर्टाने सह३मती दर्शवली असून, २७ जुलै (सोमवार) ▶▶ पान २ वर

## हिमाचलमध्ये गाडीवर कोसळली दरड; १३ जणांचा दुर्दैवी मृत्यू!



लाहौल–स्पीती । वृत्तसंस्था

हिमाचल प्रदेशातील पांगी–उदयपूर मार्गावर एक अत्यंत भीषण आणि काळजाचा ठोका चुकवणारी दुर्घटना घडली आहे. धावत्या चारचाकी गाडीवर अचानक दरड कोसळल्याने १३ पर्यटकांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला, तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.

माहितीनुसार, लाहौल खोऱ्यापासून सुमारे ६० ते ७० किलोमीटर अंतरावर असलेल्या कुडूनाला भागात ही दुर्घटना घडली. कुल्लू येथून पांगीच्या दिशेने निघालेली टाटा सुमो ही गाडी कुडूनाला ▶▶ पान २ वर

# सरकारला २४ तासांचा अल्टीमेटम

## आता कॉक्रोज जनता पार्टीसोबत काँग्रेसही आंदोलन सुरू करणार



दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्लीत जंतर मंतरवर कॉक्रोज जनता पार्टीमार्फत नीट पेपरफुटीप्रकरणी आंदोलन सुरू करण्यात सुरू आहे. गेल्या २६ दिवसांपासून उपोषणाला बसलेले सोनम वांगचुक यांनी गुरूवारी मध्यरात्री आपलं उपोषण सोडलं. त्यानंतर दिल्लीतील आंदोलन समाप्त होईल अशी चर्चा सुरू होती. मात्र कॉक्रोज जनता पार्टीने धर्मेंद्र प्रधान यांच्या ▶▶ पान २ वर

### राजीनाम्यावर तडजोड नाही – सीजेपी

दिल्लीतील जंतर–मंतरवर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीने (सीजेपी) त्यांच्या मागण्यांवर ठाम भूमिका कायम ठेवली आहे. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये शुक्रवारी (दि.२४) केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह तसेच सीजेपीचे मुख्य प्रवक्ते सौरव दास आणि राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका यांच्यात बैठक पार पडली. त्यांच्यामध्ये जवळपास दोन तास बैठक झाली. आमच्या तीनपैकी दोन मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. पण धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर कोणतीही तडजोड होणार नाही, असे सरकारसोबतच्या झालेल्या बैठकीत सीजेपीकडून सांगण्यात आले.

### उद्या आंदोलकांना चोप देणार–हिंदू रक्षा दल

एका हिंदुत्ववादी संघटनेने आंदोलकांना थेट मारहाण करण्याची उघड धमकी दिली आहे. गाझियाबादमध्ये 'हिंदू रक्षा दल' नावाची संघटना चालवणारे पिंकी चौधरी यांनी २६ जुलै रोजी दुपारी १२ वाजता जंतर–मंतरवर पोहोचून आंदोलकांना धडा शिकवण्याची घोषणा केली आहे, ज्यामुळे दिल्लीत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. आपल्या वादग्रस्त विधानांमुळे नेहमीच चर्चेत राहणाऱ्या पिंकी चौधरी यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ पोस्ट करत ही धमकी दिली आहे. या व्हिडिओमध्ये त्यांनी आंदोलकांवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. चौधरी यांच्या मते, जंतर–मंतरवर जमलेले लोक सनातनविरोधी असून ते देशाचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत. भारताची जगभरात बदनामी करण्यासाठीच हे आंदोलन सुरू असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

cmyk

## अग्रलेख

# ढासळती शिक्षण व्यवस्था आणि तरुण भारताची वेदना

भारतातील शिक्षण व्यवस्था आज एका गंभीर वळणावर उभी आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी थेट संबंधित असलेल्या परीक्षा, प्रवेशप्रक्रिया आणि उच्च शिक्षणाच्या संधी यांबाबत निर्माण झालेला अविश्वास दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच विद्यार्थ्यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी रस्त्यावर उतरल्यावर संवादाऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जात असेल, तर तो लोकशाहीसाठी धोक्याचा इशारा मानावा लागेल.

गेल्या काही वर्षांत देशात अनेक स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्या. राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. लाखो विद्यार्थ्यांनी वर्षानुवर्षे केलेली मेहनत काही तासांत व्यर्थ ठरली. परीक्षा रद्द होणे, निकालात गोंधळ, प्रवेश प्रक्रियेत विलंब आणि सतत बदलणारे नियम यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावरही मोठा परिणाम झाला आहे. शिक्षण हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार मानला जातो. मात्र सार्वजनिक शिक्षणावरील गुंतवणूक अपेक्षित प्रमाणात वाढताना दिसत नाही. अनेक सरकारी शाळा बंद होत आहेत, तर उच्च शिक्षणाचे वाढते खासगीकरण सर्वसामान्य कुटुंबांच्या आवाक्याबाहेर जात आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक शिक्षणासाठी लाखो रुपयांचा खर्च करावा लागत असल्याने गुणवंत पण आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या कार्यपद्धतीवरही सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, पेपरफुटी, तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत झाला आहे. परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची कमतरता ही आजची सर्वात मोठी समस्या बनली आहे. विद्यापीठांच्या स्वायत्ततेबाबतही गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. कुलगुरू नियुक्त्या, अभ्यासक्रमातील हस्तक्षेप आणि शैक्षणिक निर्णयांमध्ये वाढता राजकीय प्रभाव यामुळे उच्च शिक्षणाची गुणवत्ता आणि विश्वासार्हता दोन्ही धोक्यात आली आहेत. जागतिक स्तरावर कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधन आणि नवतंत्रज्ञान वेगाने विकसित होत असताना भारतीय शिक्षण व्यवस्थेला त्या गतीने पुढे जाता आलेले नाही. या सर्व परिस्थितीत विद्यार्थी आंदोलन करतात, प्रश्न विचारतात आणि उत्तरदायित्वाची मागणी करतात, तेव्हा त्यांच्याशी संवाद साधण्याऐवजी पोलिसी कारवाईचा अवलंब केला जातो, अशी टीका होत आहे. लोकशाही व्यवस्थेत मतभेद व्यक्त करणे हा घटनात्मक अधिकार आहे. विद्यार्थ्यांचा आवाज ऐकून घेणे ही कोणत्याही जबाबदार सरकारची प्राथमिक जबाबदारी असली पाहिजे. आजचा विद्यार्थी केवळ पदवीसाठी संघर्ष करत नाही; तो रोजगार, गुणवत्ता, पारदर्शकता आणि सुरक्षित भविष्य यासाठी लढत आहे. वाढती बेरोजगारी, महागडे शिक्षण आणि स्पर्धेचे प्रचंड दडपण यामुळे तरुण पिढी अभूतपूर्व मानसिक तणावाचा सामना करत आहे. अशा वेळी शासनाने विश्वास निर्माण करणारे निर्णय घेणे, परीक्षा व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा करणे आणि सार्वजनिक शिक्षणाला बळकटी देणे अत्यावश्यक आहे. देशाच्या भविष्यासाठी शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना संशय, भीती आणि असुरक्षिततेऐवजी गुणवत्तापूर्ण शिक्षण, न्याय्य संधी आणि उत्तरदायी व्यवस्था मिळाली, तरच भारताची युवा शक्ती देशाच्या विकासाची खरी ताकद ठरेल. अन्यथा शिक्षण व्यवस्थेतील ढासळलेला पाया आणि तरुणांच्या वाढत्या असंतोषाची किंमत संपूर्ण देशाला मोजावी लागू शकते.

# भाजपच्या आंदोलनानंतर काँग्रेसकडून गोमूत्र शिंपडून आंदोलनस्थळाचे शुध्दीकरण

**जालना । प्रतिनिधी**

**दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या राजकीय वातावरणाचे पडसाद आता जालन्यात उमटले आहेत. काँग्रेसचे खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर भाजपने निषेध आंदोलन केल्यानंतर काँग्रेसनेही आक्रमक भूमिका घेत आंदोलनस्थळी गोमूत्र शिंपडून परिसर स्वच्छ करत भाजपाला प्रतीकात्मक आणि राजकीय प्रतिउत्तर दिले.**



जालन्यात भाजप कार्यकर्त्यांनी खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या कार्यालयासमोर आंदोलन करत राहुल गांधी आणि काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. भाजपचे आंदोलन संपल्यानंतर काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने कार्यालयासमोर जमा झाले. त्यांनी आंदोलनस्थळी गोमूत्र शिंपडून परिसर 'शुद्ध' केल्याचा दावा करत भाजपवर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला. यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी राहुल गांधी यांनी देशातील महत्त्वाच्या प्रश्नांवर योग्य भूमिका मांडल्याचा दावा केला. तसेच, चोरी करणाऱ्या आणि डाका टाकणाऱ्या भाजपने आमच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे, अशी टीका त्यांनी केली. पुढे बोलताना काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी, राम मंदिरातील कथित चोरीच्या प्रकरणाविरोधात भाजपने आंदोलन केले असते, तर त्यामध्ये आम्हीही सहभागी झालो असतो. मात्र जनतेच्या खऱ्या प्रश्नांपासून लक्ष विचलित करण्यासाठी भाजप आंदोलनाचे राजकारण करत आहे, असा आरोप करत भाजपाला थेट प्रत्युत्तर दिले. दरम्यान, भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी



**अभिनंदन..!**

गेवराई येथील प्रसिद्ध आयुर्वेदीक डॉ. मुरलीधरराव देशपांडे यांना टाइम्स ऑफ इंडिया तर्फे ''आयकॉन्स ऑफ हेल्थकेअर'' पुरस्कार मिळाल्याबद्दल आ.विजयसिंह्पंडित यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.यावेळी माजी नगरसेवक राधेशाम येवले, संपादक अमोल वैद्य, जयसिंग माने ,समाधान मस्के, ओम काकडे सह आदी उपस्थित होते.

## संकटाच्या काळात मदतीसाठी धावून येणारा व्यक्ती-राहुल लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी**

**गुजरातमधील वापी परिसरात आलेल्या पुरामुळे जयपूर (ता. मंठा), परभणी आणि बीड जिल्ह्यातील काही नागरिक अडकल्याची माहिती राहुल लोणीकर यांना तात्काळ जयपूरचे सरपंच डॉ. दत्तात्रय काकडे तसेच केहाळ वडगावचे सरपंच यांनी माहिती दिली.**



ही बाब समजताच मी कोणतीही वेळ न दवडता भाजप महाराष्ट्र प्रदेशचे सरचिटणीस मा. सुनीलजी राणे, मा. राजेशजी पांडे आणि भाजप महाराष्ट्र प्रदेशचे कार्यालयीन मंत्री मा. भरतजी राऊत यांच्याशी तात्काळ संपर्क साधला. त्यांनी गुजरातमधील भाजप जिल्हाध्यक्ष मा. हेमंतजी पटेल यांच्याशी समन्वय साधत स्थानिक प्रशासनापर्यंत ही माहिती पोहोचवली. त्यानंतर चे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मदतकार्य सुरू केले. सर्वांच्या समन्वित प्रयत्नांमुळे पुरात अडकलेल्या आपल्या बांधवांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. माझ्यासाठी राजकारण म्हणजे केवळ पद किंवा सत्ता नाही. माझ्या मतदार

# शालेय बस-व्हॅनसाठी नवे नियम लागू

## • नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर होणार कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

**राज्य शासनाने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला प्राधान्य देत शालेय बस, शालेय व्हॅन आणि शैक्षणिक संस्थांच्या वाहनांसाठीच्या नियमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा केली आहे. महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बससाठीचे नियम) (पहिली सुधारणा) नियम, २०२६ अंतर्गत १६ जुलै रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या नव्या नियमांनुसार शालेय वाहतुकीचे भाडे प्रथमच अधिकृत नियमावलीच्या कक्षेत आणण्यात आले असून ते निश्चित करण्याचे अधिकार प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांना (आरटीए) देण्यात आले आहेत.**

नवीन नियमांनुसार प्रत्येक शालेय बस व व्हॅनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली, सीट बेल्ट, डिजिटल हजेरी प्रणाली, पॅनिक बटण, व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस तसेच अन्य आवश्यक सुरक्षा सुविधा असणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवासावर अधिक प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होणार असून शालेय वाहतूक अधिक सुरक्षित आणि पारदर्शक होणार आहे. पालकांना आता मोबाईल ॲपच्या माध्यमातून आपल्या पाल्याच्या प्रवासावर थेट लक्ष ठेवता येणार आहे. वाहनांमधील सीसीटीव्ही फुटेज किमान ३० दिवस सुरक्षित ठेवणे तसेच आवश्यकतेनुसार परिवहन, शिक्षण किंवा पोलिस विभागाला उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी चालक व मदतनिसांची पोलिस पडताळणी आणि शारीरिक सक्षमता तपासणी अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच इयत्ता पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये महिला मदतनीस नियुक्त करणेही सक्तीचे करण्यात आले आहे. याशिवाय बसमध्ये चढणाऱ्या व उतरणाऱ्या विद्यार्थ्यांची डिजिटल नोंद ठेवणे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि परिवहन व शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून संयुक्त तपासणी करणे आवश्यक राहणार आहे. जिल्हा शालेय बस सुरक्षा समित्यांना दर तीन महिन्यांनी अहवाल सादर करावा लागणार आहे. दरम्यान, शाळा व महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरू झाल्यानंतर शालेय वाहतुकीबाबत विविध तक्रारी प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने दि. २३ जुलै ते ३० जुलै २०२६ या कालावधीत विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत शालेय बस, शालेय व्हॅन आणि शैक्षणिक संस्थांच्या वाहनांची सखोल तपासणी केली जाणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे. परिवहन विभागाने शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक, प्राचार्य, शालेय बस समित्या तसेच वाहनधारकांनी नव्या नियमांचे काटेकोर पालन करावे, अशी सूचना केली आहे. तपासणीदरम्यान वाहनांची सर्व वैध कागदपत्रे सोबत ठेवावीत, अन्यथा नियमानुसार कारवाईला सामोरे जावे लागेल, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनिष दौंड यांनी केले आहे.

## शिक्षणाधिकारी हिंगोणेकर यांना अटक!

**बीड । प्रतिनिधी**

**बीडचे माजी शिक्षणाधिकारी तथा प्रसिद्ध लेखक शशिकांत हिंगोणेकर यांना बोगस शालार्थ आय डी घोटाळा प्रकरणी अटक करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.२०१५ ते २०१७ या काळात ते बीडचे प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत होते, तत्पूर्वी त्यांनी जळगाव येथे हा शालार्थ आयडी घोटाळा केल्याचे उघड झाले आहे.**

१६० कोटी रुपयांच्या गाजलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्यात तत्कालीन माध्यमिक शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर यांना पोलिसांनी धुळ्यातून अटक केली आहे. २०११ ते २०१५ या काळात जळगाव जिल्ह्यात पदावर असताना त्यांनी २५९ जणांना बनावट मान्यता दिल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. हिंगोणेकर यांनी जळगाव मध्ये ज्याप्रमाणे घोटाळे करून बोगस शिक्षक भरतीला सहकार्य केले तशाच पद्धतीने त्यांनी बीडमध्ये देखील अनेक संस्थाचालक, कार्यवाह, सहकार्यवाह यांना मदत करून बीड जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात शालार्थ आयडी घोटाळा केला असून त्याचा तपास सुरु झाला आहे. १६० कोटी रुपयांच्या गाजलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्यात तत्कालीन माध्यमिक शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर यांना पोलिसांनी धुळ्यातून अटक केली आहे. २०११ ते २०१५ या काळात जळगाव जिल्ह्यात पदावर असताना त्यांनी २५९ जणांना बनावट मान्यता दिल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

# नीट-टी.ई.टी.पेपरफुटीविरोधी आंदोलन

## केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान व दादा भुसे यांच्या राजीनाम्यासाठी माजलगावात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची निदर्शने

**माजलगाव । प्रतिनिधी**

**देशभरात मोठ्या प्रमाणावर उघडकीस येत असलेल्या 'नीट' आणि 'टीईटी' परीक्षांमधील पेपरफुटीच्या घटना, नॅशनल टेस्टिंग एजन्सीचा (एन.टी.ए.) ढिसाळ कारभार आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी चाललेला खेळखंडोबा याविरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) च्या वतीने दि २३ जुलै गुरुवार रोजी माजलगाव तहसील कार्यालयावर जेष्ठ कम्युनिष्ट नेते कॉ. बाबा सर यांचे नेतृत्वात तीव्र निदर्शने करण्यात आली. या निदर्शनांनंतर माजलगाव तहसीलदारांमार्फत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तहसीलदार यांचे मार्फत विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.**

एन.टी.ए.ची घालमेल अन् विद्यार्थ्यांच्या स्वप्नांशी खेळ निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, वैद्यकीय व शैक्षणिक प्रवेशासाठी रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या सर्वसामान्य व गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची केंद्र सरकारने क्रूर थट्टा केली आहे. 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' (एन.टी.ए.) परीक्षांच्या गोपनीयतेचे रक्षण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरली असून या संस्थेने आपली विश्वासार्हता गमावली आहे. हा केवळ परीक्षांमधील घोटाळा नसून प्रामाणिक विद्यार्थ्यांची उघडउघड झालेली लूट आहे. लोकशाही मार्गाने उपोषण करणाऱ्यांवर दडपशाहीचा आरोप शिक्षणातील गैरप्रकार आणि पर्यावरणाच्या मुद्द्यांवर दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततापूर्ण मार्गाने आमरण उपोषणाला बसलेले महान शास्त्रज्ञ व पर्यावरणकर्ते सोनम वांगचुक तसेच एस.एफ.आय. च्या कार्यकर्त्यांना हुकूमशाही पद्धतीने उचलून लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न केंद्र सरकार करत आहे.या दडपशाही धोरणाचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे.निट व टि.ई.टी पेपरफुटीच्या मुख्य सूत्रधारा शोधून त्यांच्यावर कडक कायदेशीर शिक्षा करण्यात यावी, राजीनाम्याची मागणी परीक्षांमधील गैरप्रकारांची व शैक्षणिक गोंधळाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानआणि महाराष्ट्राचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे या दोघांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा,एन.टी.ए. वर बंदी पारदर्शकता राखण्यात निष्फळ ठरलेल्या 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' (एन.टी.ए.) या संस्थेवर तत्काळ बंदी घालावी. माजलगाव तहसील कार्यालयावरील या आंदोलनात भाकप (मा) चे तालुका सचिव कॉ.शिवाजी कुरे, किसानसभेचे कॉ. कृष्णा सोळंके,कॉ.मोहन जाधव,कॉ.दत्ता डाके,कॉ.सुहास झोडगे, कॉ.सय्यद फारुख अण्णा, कॉ.अशोक डाके, कॉ.शेख महबूब, कॉ.सुभाष डाके, कॉ.पवन चिंचाणे, कॉ.रामभाऊ राऊत,उषा औसे, ज्योती घडसे,इंदू पाटोळे यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## पान १ वरून...

### पहिल्या टप्प्यात १७ लाख

कर्जमाफी मिळेल. आज पांडुरंगाच्या चरणी याची सुरुवात केली आहे, असे फडणवीस म्हणाले. आम्ही विधानसभा निवडणुकीत घोषणा केली होती की सरकार पुन्हा आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ. त्यानंतर सरकार सत्तेवर आले. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आदी सगळ्या निवडणुकांमध्ये प्रचंड मोठा आशीर्वाद शेतकऱ्यांनी आणि लोकांनी आम्हाला दिला. पुढील पाच वर्षे कोणत्याही निवडणुका नसतानाही आम्ही शेतकऱ्याला दिलेला शब्द मोडला नाही. देशातील सर्वात मोठी कर्जमाफी घोषित केली, असेही त्यांनी नमूद केले.

---------------

### लाडकी बहीण योजनेची अंतिम

लाभार्थी यादीतून वगळले जाईल. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितले की, ई-केवायसी आणि पडताळणी प्रक्रियेमुळे योजना अधिक पारदर्शक झाली आहे. अपात्र महिलांच्या आकड्यांबाबत विरोधक जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

---------------

### पेपरफुटीविरोधात केंद्र

कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे बैठक झाली. सीजेपीने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी, स्पर्धा परीक्षांमधील कथित गैरप्रकारांची जबाबदारी निश्चित करणे आणि आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याची मागणी केली. एकीकडे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून तोडगा काढण्याचा प्रयत्न सुरू आहे, तर दुसरीकडे परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी कठोर कायदेशीर चौकट उभी करण्यावर सरकार भर देत आहे.

----------

### जंतर-मंतर लाठीचार्ज प्रकरणात

रोजी या याचिकेवर सुनावणी होणार आहे. या प्रकरणाचा उल्लेख सर्वोच्च न्यायालयासमोर करण्यात आल्यानंतर न्यायालयाने सुनावणीसाठी तारीख निश्चित केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून करण्यात आलेल्या लाठीचार्जच्या मुद्द्यावर आता न्यायालयीन सुनावणी होणार आहे. या प्रकरणाची सुनावणी भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांच्या खंडपीठासमोर होणार आहे. याचिकाकर्त्यांनी जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या कथित लाठीचार्जाची न्यायालयीन चौकशी करण्याची तसेच संबंधित प्रकरणात आवश्यक निर्देश देण्याची मागणी केली आहे. निट आणि इतर स्पर्धा परीक्षांतील कथित गैरप्रकारांच्या विरोधात दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनादरम्यान पोलिसांनी विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केल्याचा आरोप करण्यात आला असून त्याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या घटनेनंतर विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि विद्यार्थी संघटनांनी संताप व्यक्त केला होता. या पार्श्वभूमीवर आता सर्वोच्च न्यायालय या प्रकरणाची सुनावणी घेणार असल्याने या प्रकरणाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

---------------

### विद्यार्थ्यांवर लाठीमार करणाऱ्यांवर

परीक्षेतील गैरव्यवहाराच्या निषेधार्थ दिल्लीत विद्यार्थ्यांकडून आंदोलन सुरू असून, या आंदोलनादरम्यान पोलिसांनी विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केल्याचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर सविस्तर भूमिका मांडली. त्यांच्या मते, विद्यार्थ्यांनी आपल्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी आंदोलन केले. त्यामुळे त्यांच्यावर अशा प्रकारे बळाचा वापर करण्याचे कारण काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, आंदोलनादरम्यान समोर आलेल्या व्हिडिओंमध्ये केवळ आंदोलनकर्तेच नव्हे तर परिसरातील इतर नागरिकांनाही मारहाण होत असल्याचे दिसते. अशा प्रकारची कारवाई वरिष्ठांच्या आदेशाशिवाय होऊ शकत नाही, असा दावा त्यांनी केला. त्यांनी असेही नमूद केले की, पोलिसांना अनेकदा वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसारच कारवाई करावी लागते. त्यामुळे केवळ पोलिसांनाच दोष देणे योग्य ठरणार नाही; तर असे आदेश देणाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. विद्यार्थ्यांना शिक्षा करण्याचा अधिकार कोणालाही नाही. राज ठाकरे यांनी शाळांमधील शारीरिक शिक्षेचा संदर्भ देत म्हटले की, पूर्वी शिक्षक विद्यार्थ्यांना मारहाण करत असत, मात्र न्यायव्यवस्थेच्या हस्तक्षेपानंतर त्यावर निर्बंध आले. विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा करण्याचा अधिकार कोणालाही नाही, मग आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करण्याचा अधिकार पोलिसांना कोणी दिला, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आपल्या भूमिकेत त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघ आणि ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने मांडलेल्या तत्त्वांचाही उल्लेख केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, कोणत्याही परिस्थितीत बळाचा वापर करताना तो कायद्याच्या चौकटीत, आवश्यक तेव्हाच, प्रमाणबद्ध आणि उत्तरदायित्वासह असला पाहिजे. तसेच नॉर्वे, जर्मनी, स्वीडन, फिनलंड, डेन्मार्क आणि न्यूझीलंडसारख्या देशांमध्ये पोलिसांकडून बळाचा वापर झाल्यास त्याची स्वतंत्र चौकशी केली जाते आणि विशेषतः आदेश देणाऱ्यांची जबाबदारी तपासली जाते, असेही त्यांनी नमूद केले. राज ठाकरे यांनी या मुद्द्यावर नागरी समाजाने चर्चा घडवून आणण्याची गरज व्यक्त केली. तसेच खासदारांनी संसदेत या विषयावर चर्चा व्हावी, अशी मागणी करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

---------------

### सरकारला २४ तासांचा

राजीनाम्यावर ठाम रहात आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला. सरकारकडून जेपी नड्डा आणि जितेंद्र सिंह यांनी सीजेपीच्या प्रतिनिधिंशी चर्चा केली. यानंतर बोलताना सीजेपीने प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत उद्यापर्यंत अल्टीमेटम दिला आहे. कॉक्रोज जनता पार्टीने धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय हे आंदोलन संपणार नाही असं स्पष्ट केलं. त्याचबरोबर आता सेंट्रल दिल्लीत प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस आंदोलन सुरू करणार आहे. हे आंदोलन आजपासून सुरू होणार असून नीट पेपर लीक प्रकरण आणि आंदोलक विद्यार्थ्यांना दिल्ली पोलिसांनी केलेली मारहाण याच्या विरोधात हे आंदोलन असणार आहे. त्याचबरोबर काँग्रेसने आपल्या सर्व जिल्हाध्यक्षांना कँडल मार्च आणि सत्याग्रह आंदोलन सुरू करण्यास सांगितलं आहे. दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी जंतर मंतरवरील १.५ किलोमीटर रेडीयसचे इंटरनेट बंद करण्याच्या निर्णयाविरूद्धच्या याचिकेवर त्वरित सुनावणी घेण्यास मान्यता दिली आहे. याचबरोर देशातील शेकडो वकिलांनी देशाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांना एक चिठ्ठी लिहून २१ जुलैच्या पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेरच्या आंदोलनाबाबत न्यायालयीन हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे. या विनंतीत राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, प्रियांका गांदी वाड्रा, अखिलेश यादव यांच्यासह अनेक खासदार हे हाय सिक्युरिटी झोनममध्ये कोणतीही पूर्वसुचना न देता आणि परवानगीशिवाय पोहचले होते. त्यामुळं कायदा आणि सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे असं देखील म्हटलं आहे. पुढचे दोन दिवस सुट्टी असल्यामुळं दिल्लीतील आंदोलनस्थळी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी जमा होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी जामिया मिलिया इस्लामिया आणि दिल्ली विद्यापीठातील २५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना ताब्यात घेतलं आहे. त्यांना लोधी कॉलनी पोलीस ठाण्यात नेण्यात आलं आहे. दरम्यान, सरकार आणि कॉक्रोज जनता पार्टीचे प्रवक्ते सौरव दास आणि आशुतोष रांका यांनी जेपी नड्डा आणि जितेंद्र सिंह यांची भेट घेतली. त्यावेळी प्रमुख तीन मागण्यांवर चर्चा झाली. त्यातील दोन मागण्यांबाबत सरकार सकारात्मक आहे. मात्र प्रमुख मागणी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत सरकारने शनिवार दुपारपर्यंतचा वेळ मागितला आहे.

---------------

### हिमाचलमध्ये गाडीवर कोसळली

जवळ पोहोचली असता, अचानक डोंगराचा मोठा भाग गाडीवर कोसळला आणि काही क्षणांतच संपूर्ण गाडी ढिगाऱ्याखाली दबली गेली. घटनेची माहिती मिळताच भरमौरचे आमदार जनक राज यांनी चंबा आणि लाहौल-स्पीतीचे जिल्हाधिकारी तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेशी संपर्क साधून तातडीने मदत व बचाव कार्य सुरू करण्याचे निर्देश दिले. पोलीस आणि बचाव पथक त्वरित घटनास्थळी दाखल झाले असून, ढिगाऱ्याखालून एका जखमीला सुखरूप बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्रशासन आणि स्थानिक बचाव पथकांकडून सध्या जेसीबीच्या साहाय्याने ढिगारा हटवण्याचे काम वेगाने सुरू आहे. बचाव मोहीम पूर्ण झाल्यानंतरच मृत व जखमींचा अंतिम आकडा आणि त्यांच्या ओळखीबाबत अधिक स्पष्टता येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. २५ जुलै २०२६ | ३

## थोडक्यात



### भर पावसात कुसळंब येथे स्व.अजित दादांना अभिवादन!

पाटोदा । प्रतिनिधी

२२ जुलै रोजी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांची जयंती ही शासकीय स्वरूपात करण्याचे आदेश जरी आले असले तरी सर्वसामान्य जनतेने देखील आपल्या नेत्याला अभिवादन करण्याचं ठरवलं होतं. भर पावसामध्ये कुसळंब येथे स्वर्गीय अजित दादांना अभिवादन करण्यासाठी सर्वसामान्य जनता, कार्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे येऊन नेत्याला, नेतृत्वाला, कर्तुत्वाला अभिवादन करत होते.

ज्या नेत्यांना स्वाभिमानाने जगायला शिकवलं वेळेत काम करायला शिकवलं वेळेचा महत्व सांगितलं तोच नेता वेळे आधीच निघून गेला. स्वर्गीय दादा जरी आपल्यात नसले तरी त्यांचे विचार प्रत्येकाच्या मनामनात रुजलेले आहेत तेच विचार पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी सर्वसामान्य जनता करत आहेत. कुसळंब येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात स्वर्गी अजित दादांना अभिवादन करताना पाऊस कोसळत होता तरी देखील जनतेनं पावसात येऊन दादांना अभिवादन केलं. गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक वर्ग, पक्षाचे पदाधिकारी, आजी-माजी सरपंच, सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महेश उर्फ 'पप्पू काका' खकाळ यांची कडा मंडळ भाजप युवा मोर्चा अध्यक्षपदी निवड

आष्टी । प्रतिनिधी

शेरी खकावाडीसह कडा परिसरात युवकांना संघटित करून विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण करणारे युवा कार्यकर्ते महेश उर्फ पप्पू काका खकाळ यांची भारतीय जनता पार्टीच्या कडा मंडळ युवा मोर्चा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या सातत्यपूर्ण पक्षनिष्ठा, संघटन कौशल्य आणि युवकांमध्ये केलेल्या प्रभावी कामाची दखल घेत पक्षाने ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे. या नियुक्तीचे पत्र मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश (आण्णा) धस तसेच युवा नेते जयदत्त धस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी भाजपचे पदाधिकारी, युवा कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नियुक्तीनंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष करत महेश खकाळ यांचे अभिनंदन केले. नियुक्तीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना महेश उर्फ पप्पू काका खकाळ म्हणाले, पक्षाने माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करणार आहे. कडा मंडळात भाजपची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करून युवकांना पक्षाशी जोडण्यावर भर देणार असून, जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणार आहे. या निवडीमुळे शेरी खकावाडीसह संपूर्ण कडा मंडळातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, महेश खकाळ यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# युसूफवडगावकरांच्या आरोग्याशी खेळ नळाला येतेय गढुळ व दुषित पाणी

## आठ-दहा वर्षांपासून जलशुद्धीकरण केंद्राची दुरावस्था; नागरिकांच्या नशिबी गढूळ व दूषित पाणी!

युसूफवडगाव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथे नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रकार समोर आला असून, गेल्या काही दिवसांपासून ग्रामस्थांना गढूळ, गाळ व मातीमिश्रित पाण्याचा पुरवठा होत आहे. गावातील जलशुद्धीकरण केंद्राची गेल्या आठ ते दहा वर्षांपासून दुरुस्ती व देखभालच झालेली नसल्याने जलशुद्धीकरणाची यंत्रणा अक्षरशः कुचकामी ठरली आहे. त्यामुळे नागरिकांना शुद्ध पाण्याऐवजी दूषित पाणी वापरण्याची वेळ आली आहे.

युसूफवडगावसाठी मांजरा धरणावर स्वतंत्र पाणीपुरवठा विहीर असून, तेथून गावाला पाणीपुरवठा केला जातो. धरणातून आणलेले पाणी जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून टाकीत चढविणे अपेक्षित आहे. मात्र, जलशुद्धीकरण केंद्राची यंत्रणा अनेक वर्षांपासून व्यवस्थित कार्यान्वित नसल्याने पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया होत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. परिणामी गढूळ व गाळमिश्रित पाणी थेट टाकीत चढवून गावकऱ्यांच्या माथी मारले जात असल्याचा आरोप होत आहे.हेच पाणी ग्रामस्थांना अंघोळ, कपडे धुणे, स्वयंपाक करणे, पिण्यासाठी तसेच जेवणाची भांडी धुण्यासाठी वापरावे लागत आहे. दूषित पाण्याच्या सततच्या वापरामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असताना, ग्रामपंचायत प्रशासन याकडे गांभीर्याने पाहणार तरी कधी? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठा करणे ही ग्रामपंचायतीची प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र, जलशुद्धीकरण केंद्राची गेल्या आठ-दहा वर्षांपासून दुरुस्ती न होणे ही बाब ग्रामपंचायतीच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून आता तरी झोपेतून जागे व्हावे आणि जलशुद्धीकरण केंद्राची यंत्रणा तातडीने दुरुस्त करून युसूफवडगावकरांना स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठा करावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांतून होत आहे.





# काचरवाडीच्या ऊसतोड कामगार कुटुंबातील ज्ञानेश्वर ची निटमध्ये घवघवीत कामगिरी; ५९० गुण मिळवत संपादन केले उल्लेखनीय यश

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील विडा परिसरातील मौजे काचरवाडी या अतिशय दुर्गम व डोंगराळ गावातील विद्यार्थी ज्ञानेश्वर दादाराव पडवळे याने वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेसाठी घेण्यात आलेल्या NEET-२०२६ परीक्षेत ५९० गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेल्या या यशामुळे काचरवाडी गावासह संपूर्ण विडा परिसरातून ज्ञानेश्वरवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशाबद्दल ईडा शिक्षण संस्था, विडा यांच्या वतीने ज्ञानेश्वरचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव धैर्यशील भाऊ देशमुख, लेक लाडकी अभियानाचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे, केंद्रप्रमुख सुभाष सारुक, सुनिता बांगर मुख्याध्यापिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गौरवाडी, तसेच दत्तात्रय वरपे यांच्या हस्ते ज्ञानेश्वरचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ



देऊन सन्मान करण्यात आला व त्याला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

ज्ञानेश्वरचे वडील दादाराव तुळजीराम पडवळे आणि आई चंद्रकला दादाराव पडवळे हे ऊसतोडणीचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आर्थिक अडचणी, डोंगराळ परिसरातील मर्यादित सुविधा आणि कठीण परिस्थिती असूनही ज्ञानेश्वरने जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले आहे.विशेष म्हणजे ज्ञानेश्वरचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, काचरवाडी येथे झालेले आहे. या यशामुळे जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता आणि दर्जा कमी नसून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता दडलेली आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. योग्य मार्गदर्शन, शिक्षकांची मेहनत आणि विद्यार्थ्यांची जिद्द याच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठी स्वप्ने पूर्ण करू शकतात, असा विश्वास या निमित्ताने व्यक्त करण्यात आला. गावकऱ्यांनी ज्ञानेश्वरच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करत त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. हे यश काचरवाडीसारख्या दुर्गम गावातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे असे मत लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

## पान ६ वरुन...

### गहिनीनाथ गड-वामनभाऊ

या अखंड नामगजरात वारकऱ्यांची सेवा करण्याचा भक्तिमय सोहळा सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

या महापंगतीत आमदार सुरेश आण्णा धस, युवा नेते जयदत्त धस, माजी नगराध्यक्ष रंगनाथ अण्णा धोंडे, अमर निंबाळकर, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद रोडे, घोडके, उपाध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, माजी अध्यक्ष भारत मुरकुटे, सुरेश वारुंगळे, ज्ञानदेव राऊत, अरुण निकाळजे, नगरसेवक बाळासाहेब घोडके, अक्षय धोंडे, शाम वाल्हेकर, हनुमंत जंजीरे, दीपक बांगर, अजित मुळे, कपील अग्रवाल, शरद रेडेकर, संतोष रनसिंग, अमोल गळगटे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वारकऱ्यांना प्रेमाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचे वाटप केले.

वारकरी संप्रदायात अन्नदानाला सर्वोच्च सेवा मानली जाते. विठुरायाच्या चरणी भक्तीभाव अर्पण करत वारकऱ्यांची सेवा करण्याची ही परंपरा आमदार सुरेश आण्णा धस यांनी यंदाही जपली. भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम घडविणारा हा महापंगतीचा सोहळा वारकऱ्यांच्या स्मरणात राहणारा ठरला.।। विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल ।।

### प्रियदर्शनी प्राथमिक

पांडुरंगची महती विषद केली . महाराष्ट्रातील अनेक ठिकाणावरून तर दिंड्या पंढरपूर या ठिकाणी येतात यावर्षी लंडनवरून दिंडी पंढरीला आली आहे याची माहिती दिली.यानंतर पांडुरंगाचे भजन गीत गायनात सर्व कर्मचारी विद्यार्थी सहभागी झाले.. शाळेत परत येऊन पसायदानाने दिंडी सोहळ्याचा समारोप करण्यात आला.

### दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील

त्यांच्यावर लाठीमार करण्यात आला. या घटनेची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा. विद्यार्थ्यांवरील कारवाईची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. आंदोलनात युवा संघटनेचे जिल्हा अध्यक्ष सुहास झोडगे, महेबुब शेख, फारुख सय्यद, एसएफआयचे जिल्हा सचिव पवन चिंचाने, यशवंत संक्राते, ओंकार टकले, महादेव इंगळे व कृष्णा इंगळेसह विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी शैक्षणिक बंद पाळुन प्रशासनामार्फत केंद्र सरकारला निवेदन पाठवून विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध नोंदविला.

### लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ सोमवारी

करण्यात येणार असून, कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने होणार आहे. बैठकीस सुशीलाताई मोराळे, प्राचार्य डॉ. सविता शेटे, प्राचार्य डी. जी. तांदळे, दादासाहेब मुंडे, शेख शफीक, अमर शेख, राजेंद्र आमटे, अविनाश डरफे, बाळासाहेब मोरे, गणेश मस्के, संगमेश्वर आंधळकर, ज्योतिराम हुरकुटे, सय्यद मुसा, नितीन जयभये, सय्यद अब्दुल, सुहास जयभये, डॉ. संजय तांदळे, शेख आदम, विजय घेवारे, सोपान पोपट आदी उपस्थित होते. ही रॅली किल्ला मैदान (बलभीम-मिलिया महाविद्यालय),बलभीम चौक , करंजा रोड , बशीरगंज चौक , छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ,जिल्हाधिकारी कार्यालय अशी जाईल. विद्यार्थी व पालकांनी तिरंगा ध्वजासह शांततेत रॅलीत सहभागी व्हावे. सर्वांनी शिस्त, संयम आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देत रॅली यशस्वी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### सावता माळी परिसरातील

स्मशानभूमीचे संरक्षण करून आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात, अतिक्रमण रोखावे आणि या संवेदनशील सार्वजनिक जागेचे अस्तित्व कायम ठेवावे.

रामनाथ खोड, सामाजिक कार्यकर्ते तथा वृक्षप्रेमी

सार्वजनिक निधीतून उभारलेल्या स्मशानभूमीची अशी अवस्था होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने दखल घेतली नाही, ही गंभीर बाब आहे. स्मशानभूमीची मोजणी करून अतिक्रमण रोखावे, आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी. अन्यथा भविष्यात ही सार्वजनिक मालमत्ता कायमची गमावण्याची वेळ येऊ शकते.

सूचना: दुसऱ्या प्रतिक्रियेसाठी जर एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे नाव द्यायचे असेल (उदा. पर्यावरणप्रेमी, माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, वकील किंवा स्थानिक नागरिक), तर त्यांचे नाव सांगा. त्या व्यक्तीच्या भूमिकेनुसार प्रतिक्रिया अधिक वास्तववादी आणि प्रभावी करून देतो.

डॉ. गणेश ढवळे, सामाजिक कार्यकर्ते

# अभियांत्रिकीच्या प्रत्येक प्रवेश फेरीतील शुल्क वाढ रद्द करा- डॉ. तांदळे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६ - २७ च्या प्रवेशासाठी तंत्रशिक्षणाच्या अंतर्गत असलेल्या अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेतील प्रवेशाची पहिली फेरी २८ जुलै २०२६ पासून सुरू होणार असून संपूर्ण प्रवेश प्रक्रिया चार फेऱ्यात दिनांक १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत चालणार आहे. केंद्रीभूत जागा शुल्काच्या रचनेत यंदापासून बदल करण्यात आला आहे. नव्या नियमानुसार पहिल्या फेरीनंतर बेटरमेंट द्वारे नवीन जागा स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक फेरीत वाढीव शुल्क भरावे लागणार आहे.प्रवेशासाठी चांगल्या महाविद्यालयाची प्रतीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांवर या निर्णयामुळे मोठा आर्थिक भार पडणार असल्याने या निर्णयाला विद्यार्थ्यांचा व पालकांचा विरोध होत आहे. यापूर्वी पहिल्या फेरीत जागा स्वीकारण्यासाठी एक हजार रुपये भरल्यानंतर पुढील फेऱ्यांमध्ये अतिरिक्त शुल्क लागत नव्हते.मात्र आता पहिल्यांदा जागा स्वीकारताना एक हजार रुपये, दुसऱ्या फेरीत बेटरमेंटद्वारे नवीन जागा मिळाल्यास दोन हजार रुपये आणि तिसऱ्या फेरीत पुन्हा बेटरमेंन्ट मिळाल्यास तीन हजार रुपये स्वतंत्रपणे भरावे लागतील. हे शुल्क परत मिळणार नाही.गुणवत्तेच्या आधारे



मिळणाऱ्या प्रवेशावर असा आर्थिक दंड लादणे चुकीचा असल्याने या निर्णयाला विद्यार्थी व पालकांच्या विरोधात असून हा निर्णय विद्यार्थीविरोधी अन्यायकारक आणि शिक्षणाच्या हक्कावर आर्थिक अडथळे असणारा असल्याने प्रत्येक प्रवेश फेरीतील शुल्क वाढ रद्द करावी अशी मागणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी दिनांक २२ जुलै २०२६ बुधवार रोजी राज्याच्या शिक्षण मंत्र्याकडे तसेच राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षा कडे निवेदनाद्वारे केली आहे. ही शुल्क वाढ रद्द न केल्यास आंदोलनाचा इशारा देखील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# धानोरा खुर्द येथे उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा ग्रामस्थांतर्फे सत्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा खुर्द येथे ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामस्थांच्या वतीने गावात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गुरुवार (दि. २३) रोजी सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

गावातील सामाजिक, शैक्षणिक, कृषी, महसूल व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा यावेळी शाल व आंब्याचे रोप देऊन सन्मान करण्यात आला. युसूफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दारूबंदी करणारे नव्याने रुजू झालेले सहायक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे,गावात दारूबंदी मोहिमेसाठी विशेष योगदान दिल्याबद्दल बनसारोळा बिट अंमलदार अरुण मोरे, श्री चव्हाण , महाराष्ट्र शासनाचा 'कृषी सेवा रत्न' पुरस्कार प्राप्त सहाय्यक कृषी अधिकारी पंडित काकडे, गेली सात वर्षे विना तक्रार महसुली सेवा देणारे ग्राम महसूल अधिकारी सुहास चाटे, नव्याने पोलीस पाटीलपदी निवड झालेले श्रीराम सतीश ढगे, तसेच उत्कृष्ट शैक्षणिक सेवा दिल्याबद्दल शिक्षक कचरू रंजवे, सूर्यकांत धायगुडे, सहशिक्षिका शेख अंजुम व शेख नाजिमा यांचा गौरव करण्यात आला.

याशिवाय पेरू लागवडीतून भरघोस उत्पादन घेऊन आदर्श शेतीचा आदर्श निर्माण करणारे शेतकरी गजानन जगताप यांचाही ग्रामस्थांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी सत्कारमूर्तींना पुढील



वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.कार्यक्रमास सरपंच पार्वतीबाई पोळ, ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद जोगदंड, बालासाहेब गुणाले, दिलीपराव ढगे, लायक सय्यद, बाळासाहेब जगताप, रज्जाक पटेल, बाबुराव कासले, मदन पुरी, अशोक साबळे, रहेमान पटेल, भरत जगताप, बालासाहेब ढगे, अस्लम सय्यद, जमलोदिन सय्यद, मनीषा गोवगावकर, कौशल्या ढगे, अश्विनी ढगे यांच्यासह गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-९२३ दिनांक १७/०७/२०२६

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **सोमनाथ रामेश्वर लेकुरवाळे, रा. पानेगाव ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वतःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | सोमनाथ रामेश्वर लेकुरवाळे | स्वतः | २०/०६/२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१७/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-१५२ दिनांक १०/०७/२०२६

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **गंगाधर देवराव पटेकर, रा. कौडगाव ता. अंबड जि. जालना** यांनी त्यांच्या नातीःच्या नामे **श्रुती रोहन पटेकर रा.कौडगाव** यांचा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | श्रुती रोहन पटेकर | नाती | १२/०७/२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-/ / २०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-९८७ दिनांक २३/०७/२०२६

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **भगवान दामोधर गांडगे, रा. अंबड ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या मुलगाच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | अखिलेश भगवान गांडगे | नाती | १२/०५/२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२३/०७ / २०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# राज्यात १३ ऑगस्टपासून 'लाळ्या खुरकूत' प्रतिबंधक लसीकरण मोहीम

पुणे / प्रतिनिधी

राज्यातील पशुधनाचे लाळ्या खुरकूत (एफएमडी) या घातक विषाणूजन्य रोगापासून संरक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे १३ ऑगस्ट २०२६ पासून राज्यभर लाळ्या खुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेची नववी फेरी राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे शंभर टक्के लसीकरण करून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

या मोहिमेसाठी केंद्र शासनाकडून राज्याला एक कोटी लसमात्रा उपलब्ध करून देण्यात आल्या असून त्यांचे वितरण 'आयव्हीबीपी' संस्थेमार्फत सुरू आहे. लसीकरणापूर्वी सर्व जिल्ह्यांपर्यंत लसी वेळेत पोहोचाव्यात, यासाठी शीतसाखळीचे (कोल्ड चेन) काटेकोरपालन करून पुरवठा केला जात आहे. त्यामुळे राज्यातील मोठ्या प्रमाणावरील पशुधनाला लाळ्या खुरकूत रोगापासून संरक्षण



मिळण्यास मदत होणार आहे, असे पाटील यांनी सांगितले. लसीकरण अधिक परिणामकारक ठरावे यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून पशुधनाचे जंतनिर्मूलनही करण्यात येत असून, त्यासाठी आवश्यक औषधांचा पुरवठा संबंधित यंत्रणांना करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत खासगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांनी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम (एनएडीसीपी) अंतर्गत पशुधनाचे लसीकरण करून त्याची नोंद 'एनडीएलएम' प्रणालीवर केल्यास प्रति पशुधन पाच रुपये प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे.

### पशुवैद्यकीय सेवांसाठी संपर्क

पशुधनाला रोगांपासून सुरक्षित ठेवणे आणि पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळणे, या उद्देशाने ही मोहीम राज्यातील सर्व जिल्ह्यांत व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. पशुवैद्यकीय सेवांसाठी पशुपालकांनी १९६२ या टोल-फ्री क्रमांकावर किंवा ९०६३१४२२९९ या व्हॉट्सअॅप चॅटबॉट सेवेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६४८ : आदिलशहाच्या आज्ञेवरुन मुस्तफाखान याने जिंजीनजीक शहाजीराजे यांना कैद केले.
१९१७ : कॅनडात आयकर लागू झाला.
१९४३ : दुसरे महायुद्ध इटलीत बेनिटो मुसोलिनीची हकालपट्टी झाली.
१९७८ : जगातील पहिली 'टेस्ट ट्युब बेबी' लुईस जॉन ब्राऊन, इंग्लंडमधील लँकेशायर येथे जन्माला आली.
१९८४ : सोव्हिएत संघाची स्वेतलाना साव्हित्स्काया अंतराळात 'चालणारी' प्रथम महिला अंतराळवीर बनली.
१९९२ : स्पेनमधील बार्सिलोना येथे २५ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९४ : इस्त्राएल व जॉर्डनमधे १९४८ पासुन सुरू असलेले युद्ध अधिकृतरित्या समाप्त
१९९७ : इजिप्तचे अध्यक्ष मोहम्मद होस्नी मुबारक यांची १९९५ च्या आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी दिल्या जाणार्या जवाहरलाल नेहरू

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस


१९९७ : के. आर. नारायणन भारताचे १० वे, पहिले दलित आणि पहिले मल्याळी राष्ट्रपती बनले.
१९९९ : लान्स आर्मस्ट्राँगने आपली पहिली टूर डी फ्रान्स सायकल शर्यत जिंकली.
२००७ : भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून श्रीमती प्रतिभा पाटील यांचा शपथविधी
२०२० : द्रौपदी मुर्मू यांनी भारताचे १५ वे राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली
१८७५ : जिम कॉर्बेट ब्रिटिश भारतीय वन्यजीवतज्ञ, शिकारी व लेखक (मृत्यू: १९ एप्रिल १९५५)
१९१९ : सुधीर फडके ऊर्फ 'बाबूजी' गायक व संगीतकार (मृत्यू: २९ जुलै २००२)
१९२२ : विश्वनाथ वामन तथा वसंत बापट कवी व संगीतकार (मृत्यू: १७ सप्टेंबर २००२)
१९२९ : सोमनाथ चटर्जी लोकसभेचे सभापती आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८० : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' समाजसुधारक, राष्ट्रवादी विचारसरणीचे व स्वदेशी चळवळीचे प्रणेते आणि पुणे सार्वजनिक सभेचे संस्थापक (जन्म: ९ एप्रिल १८२८)
१९७७ : कॅप्टन शिवरामपंत दामले पुण्यातील महाराष्ट्रीय मंडळाचे संस्थापक, लष्करी शिक्षणाचे प्रसारक (जन्म:)
२०१२ : बी. आर. इशारा चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथालेखक (जन्म: ७ सप्टेंबर १९३४)

## महाराष्ट्रात ७७ टक्के खरीप पेरणी पूर्ण

### शेतकऱ्यांची सोयाबीन, कापूस, मका पिकांना सर्वाधिक पसंती



पुणे / प्रतिनिधी

राज्यात यंदा असमान पाऊस पडल्याने खरीप हंगामावर त्याचा परिणाम दिसून येत आहे. १ जून ते २० जुलै या कालावधीत राज्यात सरासरी ४२१ मिमी पावसाच्या तुलनेत ३६८ मिमी म्हणजेच ८७ टक्के पाऊस झाला आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत पीकपाण्याचा आढावा घेण्यात आला. २० जुलैअखेर राज्यातील १४४.३६ लाख हेक्टर सरासरी खरीप क्षेत्रापैकी १११.२५ लाख हेक्टर म्हणजे ७७ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे.गेल्या वर्षी याच तारखेला ही टक्केवारी ८८ होती, अशी माहिती बैठकीत देण्यात आली. कृषी विभागाच्या माहितीनुसार, पेरणी झालेली पिके सध्या उगवण ते वाढीच्या अवस्थेत असून त्यांच्या वाढीसाठी तातडीने चांगल्या पावसाची गरज आहे. गेल्या आठवड्यात पावसाने ओढ दिल्यामुळे भात व नाचणीच्या फेरलागवडीला काहीसा विलंब झाला होता. मात्र, आठवड्याच्या अखेरीस झालेल्या पावसामुळे फेरलागवडीच्या कामांना पुन्हा गती मिळाली आहे. पीकनिहाय पेरणीत सोयाबीनची ९१ टक्के, कापसाची ८३ टक्के आणि मक्याची ११६ टक्के पेरणी झाली आहे. मात्र, भाताची पेरणी केवळ २९ टक्क्यांवर आहे.

## खतांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना

खतांचा कार्यक्षम वापर होण्यासाठी माती परीक्षण अहवालानुसार नत्र, स्फुरद, पालाशची मात्रा द्यावी. नत्र खत देण्याची योग्य वेळ आणि एकूण मात्रेची विभागणी अधिक महत्त्वाची आहे. द्विदल धान्य, कडधान्यासाठी नत्र कार्यक्षमता महत्त्वाची आहे. सेंद्रिय खतांचा पूरक वापर हा नत्र, स्फुरद, पालाश आणि जस्ताची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. जेव्हा खत वापरले जाते तेव्हा त्यातील सर्व पोषक तत्त्वे पिकाद्वारे शोषली जात नाहीत. पिकाद्वारे पोषक तत्त्वांचा फक्त एक अंश वापरला जातो. माती परीक्षण मूल्यांनुसार निर्धारित केलेल्या मातीच्या पोषक पुरवठा शक्तीच्या आधारावर, खतांच्या शिफारसी केल्या जातात. सेंद्रिय खतांचा नियमित वापर करून जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ दरम्यान आणावा. विविध जिवाणू खतांचा (रायझोबियम, पी.एस.बी. अॅझोटोबॅक्टर २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे) वापर करावा.

सर्व प्रकारच्या जमिनीत नत्राची कमतरता कमी अधिक प्रमाणात दिसून येते. त्यामुळे पिकांना लागणारी मात्रादेखील जास्त असते. जमिनीमध्ये दिलेले नत्र वेगवेगळ्या मार्गाने वाया जाते.




एकूण दिलेल्या नत्रापैकी ३५-५५ टक्के नत्र पिकांना लागू होते. पाण्यात विरघळणे आणि वायुरूपात जाणारा अमोनिअम कमी करून नत्रयुक्त खतांची कार्यक्षमता वाढविण्यात येते. अधिक पाऊस पडणाऱ्या प्रदेशात आणि दीर्घकालीन पिकांसाठी नत्राची एकूण मात्रा २ ते ३ हप्त्यात विभागून द्यावी. भात पिकामध्ये युरिया सुपर ग्रॅन्युल्सचा वापर करावा. नॉयट्रेटयुक्त खते वाहून जाऊन येत म्हणून नियंत्रित आणि हलकी पाण्याची पाळी द्यावी. युरियामधील नत्र हळुवार उपलब्ध होण्यासाठी युरियासोबत २० टक्के निंबोळी पेंडीचा वापर करावा. चुनखडीयुक्त किंवा चोपण, चिकणमातीयुक्त जमिनी, आम्लधर्मीय जमिनीमध्ये दिलेल्या स्फुरदयुक्त खतापैकी सुमारे ८० टक्के जमिनीत स्थिर होऊन उभ्या पिकांना लागू होत नाही, म्हणून स्थिर होणाऱ्या स्फुरदाचे प्रमाण कमी करून कार्यक्षमता वाढविता येते. स्फुरदयुक्त खते क्रियाशील मुळांच्या परिसरात योग्य खोलीवर पेरून द्यावीत. रॉक फॉस्फेटसारखी खते मातीबरोबर मिसळून दिली तर कार्यक्षमता वाढते. मात्र रॉक फॉस्फेटच्या कणांचा आकार अति लहान असावा. ही खते ३ ते ४ आठवडे पेरणीपूर्वी द्यावी लागतात. दाणेदार स्फुरद खते अधिक परिणामकारक ठरतात. स्फुरदयुक्त खते शेणखत किंवा कंपोस्टबरोबर १:२ गुणोत्तराच्या प्रमाणात वापरल्यास कार्यक्षम ठरतात.

## पपई पिकात बोरॉनची कमतरता ; लक्षणे आणि व्यवस्थापन!

पपई पिकामध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे फुले व फळे तयार होण्यास अडथळा येतो. फुले फार लवकर कोमेजतात, ज्यामुळे फळांच्या उत्पादनात लक्षणीय घट होते. अशा परिस्थितीत, काही व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करून उत्पादक बोरॉनच्या कमतरतेचे दुष्परिणाम रोखता किंवा कमी करता येतात. बोरॉन हे पपई लागवडीतील एक महत्त्वाचे सूक्ष्म अन्नघटक आहे. कारण ते पेशींची निर्मिती आणि पुनरुत्पादन प्रक्रियांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे पपईमध्ये विविध लक्षणे दिसू शकतात, ज्यामुळे पिकाच्या एकूण आरोग्यावर आणि फळ उत्पादनावर वाईट परिणाम होतो.

बोरॉनच्या कमतरतेची मुख्य लक्षणे : विकृत पाने - पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेच्या सुरुवातीच्या लक्षणांपैकी एक म्हणजे कोवळी पाने विकृत होणे हे आहे. झाडाची पाने ठिसूळ होऊन वर किंवा खालच्या दिशेने गुंडाळले जातात. पानांच्या शिरा जाड होतात. पानांचा आकार लहान होतो, ज्यामुळे पाने कडक आणि विकृत दिसू शकतात. पानांच्या शिराजवळचा भाग पिवळा पडणे - बोरॉनच्या कमतरतेमुळे पपईच्या पानांमध्ये इंटरवेनल क्लोरोसिस यासारखी लक्षणे दिसतात. यामुळे पानांवर डाग पडतात किंवा ती पिवळी दिसतात. विशेषतः कोवळ्या पानांवर ही लक्षणे दिसतात. झाडाची वाढ खुंटते - प्रादुर्भावीत झाडात पेशींचे विभाजन कमी झाल्यामुळे झाडांची वाढ खुंटते. कोंबाची वाढ होत नाही किंवा त्याची मर होते, ज्यामुळे झाडाची एकूण उंची आणि जोम कमी होतो. फुले आणि फळांची वाढ होत नाही - पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे फुले आणि फळांचा विकास थांबतो. फुले अकाली कोमेजतात, ज्यामुळे फळांच्या उत्पादनात लक्षणीय घट होते. याव्यतिरिक्त, जे फळ तयार होतात ते विकृत असू शकतात, फळांना




तडे जाऊ शकतात ज्यामुळे त्यांची गुणवत्ता ढासळून ते विक्रीयोग्य राहत नाही. मुख्य खोड तडकणे - बोरॉनची कमतरता असलेल्या पपईच्या झाडांमध्ये अनेकदा मुख्य खोडामध्ये भेगा किंवा फूट दिसून येते, जे मुख्यता चिक गळण्यामुळे होऊ शकते. यामुळे झाडे कमकुवत होतात आणि रोग आणि कीटकांच्या प्रादुर्भावास अधिक बळी पडतात.

कमतरता भरून काढण्याचे उपाय : पपईतील बोरॉनच्या कमतरतेच्या व्यवस्थापनासाठी माती आणि पानांवर फवारणी तसेच माती आणि पाण्याच्या गुणवत्तेचे परीक्षण करणे आवश्यक आहे.

माती सुधारणा - पपईमध्ये बोरॉनची कमतरता दूर करण्यासाठी, बोरॅक्स (सोडियम बोरेट) किंवा सोल्युबर (सोडियम पेंटाबोरेट) सारखी बोरॉनयुक्त खते जमिनीतून देता येऊ शकतात. कमतरतेच्या तीव्रतेनुसार आणि मातीच्या प्रकारानुसार शिफारशीप्रमाणे साधारणतः १-२ किलो बोरॅक्स प्रति हेक्टर डोस द्यावे. बोरॅक्स हे जास्त प्रमाणात जमिनीत घालू नये, कारण ते विषारी होऊ शकते. पानांद्वारे फवारणी - बोरॉनच्या कमतरतेची लक्षणे लवकर भरून काढायची असल्यास पानांद्वारे फवारणी जास्त प्रभावी उपाय आहे. ०.२ ते ०.३% बोरॅक्स किंवा ०.१-०.२% सोल्युबरचे द्रावण झाडाची वाढ आणि पुनरुत्पादनाच्या अवस्थेत पानांवर फवारता येते. बोरॉनची पुरेशी पातळी राखण्यासाठी फुलधारणा आणि फळधारण अवस्थेत वारंवार फवारणी करणे गरजेचे असते. माती परीक्षण आणि खत व्यवस्थापन - बोरॉनची पातळी निश्चित करण्यासाठी आणि त्यानुसार खतांचा वापर समायोजित करण्यासाठी नियमितपणे माती परीक्षण करणे आवश्यक आहे. ७.० (अल्कलाईन) पेक्षा जास्त सामू असलेल्या मातीत बोरॉनची उपलब्धता कमी होते, त्यामुळे सेंद्रिय पदार्थ किंवा सल्फर सुधारकाद्वारे मातीचे सामू नियंत्रित केल्यास मातीद्वारे बोरॉनचे चांगले शोषण होऊ शकते. सेंद्रिय कर्ब वाढवणे - जमिनीत सेंद्रिय कर्ब वाढल्याने बोरॉनची उपलब्धता वाढते. कंपोस्ट आणि चांगले कुजलेले खत केवळ बोरॉनचा पुरवठा करत नाही तर मातीची रचना, पाणी धरून ठेवण्याची क्षमता आणि पोषक द्रव्ये टिकवून ठेवतात. जे पपईच्या झाडाद्वारे चांगल्या प्रकारे शोषले जातात. पाणी व्यवस्थापन - जास्त सामू (पीएच) किंवा कार्बोनेटयुक्त सिंचन पाणी बोरॉनची उपलब्धता कमी करू शकते. संतुलित मात्रात खनिज असलेल्या पाण्याचा वापर करून योग्य पाणी व्यवस्थापन करणे, झाडाजवळ अतिरिक्त पाणी साचणे किंवा पाण्याचा ताण टाळणे या उपायामुळे बोरॉन शोषण्यास मदत होऊ शकते. याव्यतिरिक्त, ठिबक सिंचनमुळे, मातीत योग्य प्रमाणात आर्द्रता राखण्यास मदत होते. संतुलित खत - बोरॉनच्या कमतरतेसह इतर पोषक तत्वांचे, विशेषतः कॅल्शियम आणि पोटॅशियमचे असंतुलन होते. यासाठी झाडाला संतुलित खत दिले पाहिजे, ज्यामध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांसह नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशियम यांसारख्या प्रमुख पोषक घटकांचा समावेश आहे, संपूर्ण झाडाच्या आरोग्यासाठी आणि वाढीस चालना देण्यासाठी हे आवश्यक आहे.

वरील व्यवस्थापन धोरणांची अंमलबजावणी करून, पपई उत्पादक बोरॉनच्या कमतरतेचे परिणाम टाळू शकतात आणि कमी करू शकतात, निरोगी रोपांची वाढ, फुल आणि फळांचा योग्य विकास आणि उच्च उत्पादन सुनिश्चित करू शकतात. पपई लागवडीमध्ये बोरॉनचे प्रमाण पुरेसे राखण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण आणि वेळेवर नियोजन महत्त्वाचे आहे.

## तंबाखू लागवड आणि त्याचे व्यवस्थापन



तंबाखू हे एक असे पीक आहे जे कमी वेळात तयार होते आणि शेतकरीही त्यातून चांगला नफा कमावतात. त्याची लागवड कमी खर्चात होते आणि बचतही जास्त होते. तंबाखूचा वापर सिगारेट, बिडी, सिगारेट आणि पान मसाले बनवण्यासाठी केला जातो. जमीन : तंबाखूची लागवड करण्यासाठी भुसभुशीत आणि चिकणमाती माती आवश्यक आहे. त्याच्या शेतात पाण्याचा निचरा करण्याची चांगली व्यवस्था असावी. पाणी साचल्याने झाडे कुजण्यास सुरुवात होते. तंबाखू लागवडीसाठी, जमिनीचे मूल्य ७ ते ९ च्या श्रेणीत असावे.

तापमान : तंबाखूच्या बियांच्या उगवणासाठी थंड हवामान आवश्यक असते. हे १५ ते २० अंश तापमानात चांगले वाढते. जेव्हा त्याची पाने पिकण्यास सुरवात करतात तेव्हा त्यांना अधिक तापमान आणि सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते.

रोपे :शेतात रोपे लावण्यापूर्वी त्याची चांगली नांगरणी करून नंतर काही दिवस तशीच ठेवावी. तुम्ही नांगरणी केल्यानंतरच शेतात खत टाकता. रोपांची लागवड डिसेंबर महिन्यात सुरू होते आणि त्याचे पीक तयार होण्यासाठी तीन ते चार महिने लागतात. ही झाडे सपाट शेतात कडं बनवून लावली जातात. झाडांमधील अंतर दोन ते तीन फूट ठेवावे.

सिंचन : रोपे लावल्यानंतर लगेच पाणी द्यावे. तंबाखू पिकाला १५ ते २० दिवसांच्या अंतराने पाणी लागते. झाडे लावल्यानंतर जमिनीत पाण्यामुळे तण गोठण्यास सुरवात होते, अशा वेळी २० ते २५ दिवसांनी मातीची कुंडी करावी आणि ती वेळोवेळी किंवा मध्यांतराने करावी. तंबाखू शेतीतून उत्पन्न : एक एकरात तंबाखूची लागवड केली तर या हंगामात दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकते.





# मराठवाडा वृत्तांत



# जल जीवन मिशन व स्वच्छ भारत अंतर्गत ११३६ कर्मचारी ८ महिन्यापासून विनावेतन

## जगायचे कसे; काम बंद आंदोलन सुरू

जालना। प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्रातील जिल्हा परीषदेमध्ये जिल्हास्तरावर तसेच तालुका स्तरावर कार्यरत असलेले सुमारे ११३६ कर्मचाऱ्यांना गेल्या आठ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने त्यांच्यावर गंभीर आर्थिक संकट ओढवले असून थकीत वेतन तात्काळ देण्यात यावे या मागणीसाठी आज पासून राज्यव्यापी काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या विषयाचे निवेदन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया या व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांच्यामार्फत राज्य शासनास सादर करण्यात आले. दरमहा नियमितपणे राज्य शासनाची कामे करूनही पगारासाठी महिनोन महिने प्रतीक्षा करावी लागत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, वेतनाबाबत राज्य शासन केंद्र शासनाकडे बोट दाखवत आहे. मात्र, काम राज्य शासन करून घेत असल्याने कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन देण्याची जबाबदारीही राज्य शासनाचीच असल्याची



भूमिका कर्मचारी संघटनांनी मांडली आहे.

घरभाडे, मुलांचे शिक्षण, बँक कर्जाचे हप्ते, वैद्यकीय खर्च आणि दैनंदिन उदरनिर्वाह यासाठी आवश्यक असलेला पगार आठ महिन्यांपासून न मिळाल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. काही कर्मचाऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ आली असून अनेक कुटुंबे गंभीर अडचणीत सापडली आहेत.याचवेळी शासनातील कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांचे वेतन नियमितपणे दिले जात असताना, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मात्र "निधी उपलब्ध नाही" असे कारण दिले जात असल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी केला आहे. बाह्य संस्थांना निधी देताना कोणतीही अडचण येत नाही, मात्र प्रत्यक्ष शासनाची योजना राबविणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत दुजाभाव का केला जात आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन सारख्या महत्त्वाच्या योजनेची यशस्वी अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच वेतनासाठी संघर्ष करावा लागत असल्याने शासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. संबंधित कर्मचाऱ्यांचे आठ महिन्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करून त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

"राज्य शासन आमच्याकडून नियमित काम करून घेते, त्यामुळे कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन देण्याची जबाबदारीही राज्य शासनाने स्वीकारली पाहिजे. आठ महिन्यांपासून वेतन न मिळणे ही अत्यंत गंभीर बाब असून यामुळे शेकडो कर्मचाऱ्यांचे संसार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून सर्व प्रलंबित वेतन अदा करावे, आज गुरुवार दि २३ पासून राज्यव्यापी काम बंद आंदोलनकसुरू केले असून थकीत वेतन तात्काळ देण्यात यावे अन्यथा १ ऑगस्ट पासून मुंबई येथे व्यापक स्वरूपाचे राज्यव्यापी आंदोलन करणार येणार आहे.

# गोंदी पोलिसांनी मोटारसायकल चोर पकडला; ६ लाखाचा मुद्देमाल जप्त



अंबड। प्रतिनिधी

पोलीस ठाणे गोंदी येथे पोलीस स्टेशन हद्दीत सहायक पोलीस निरीक्षक, अमोल गुरले , पोलीस कॉन्स्टेबल शाकिरोद्दीन सिध्दीकी, दिपक भोजणे, गजानन भवरे, प्रदिप हवाळे, पोकों सलमान सय्यद असे पोस्टे गोंदी हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गोपनीय माहितीवरून पोलीस टाणे गोंदी येथे दाखल असलेल्या गुन्हयातील चोरीची मोटार सायकल ही शहापुर येथील एका इसमाच्या ताब्यात आहे अशी खात्रीशिर माहीती मिळाल्याने सदर व्यक्ती ऋतीक गव्हाणे रा. दाढेगाव ता. अंबड याच्याकडे सखोल चौकशी करता त्याने गुन्हयाची कबुली देउन पोलीस स्टेशन गोंदी येथील गुन्हयातील मोटार सायकल ही काढून दिली तसेच त्याच्याकडे आणखी चौकशी करता त्याच्या ताव्यातून इतर ०४ विनाक्रमांकाच्या मोटार सायकल तसेच एक टाटा ऐस मालवाहू चारचाकी वाहण हे असा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यात मिळुन आल्याने त्यास अटक करून सदरचा एकूण ६,२०,०००/- (सहालाख विस हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर आरोपीची एक दिवसाची पोलीस कोठाडी घेण्यात आलेली असून सदर आरोपीकडे गुन्हयातील इतर मोटार सायकल व चारचाकी वाहन बाबत तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधिक्षक, श्री तेगबीर सिंह संधू , मा. अपूर पोलीस अधिक्षक, विक्रम साळी , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी , श्री सिध्देश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक, अमोल गुरले सोबत पोलीस कॉन्स्टेबल शाकिरोद्दीन सिध्दोकी, दिपक भोजणे, गजानन भवरे, प्रदिप हवाळे, पोकों सलमान सय्यद यांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक किरण हावले हे करीत आहेत.

# पुन्हा पेपर फुटणार नाही, याची हमी कोण देणार?

अहिल्यानगर

'नीट' पेपरफुटीच्या मुद्द्यावरून देशभरात संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणाची धग आता राजधानी दिल्लीपर्यंत पोहोचली आहे. दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनाला देशभरातून वाढता पाठिंबा मिळत असून, महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्येही आज विद्यार्थी आणि पालकांनी रस्त्यावर उतरून तीव्र आक्रोश व्यक्त केला. याच पार्श्वभूमीवर, अहिल्यानगरमध्ये दुसऱ्यांदा नीटची परीक्षा देणाऱ्या एका विद्यार्थिनीने आपला संताप व्यक्त करत, "पुन्हा २०२७ मध्ये नीटचा पेपर फुटणार नाही, याची गॅरंटी आम्हाला कोण देणार?" असा संतप्त सवाल उपस्थित करण्यात आला आहे. तसेच अहिल्यानगर येथून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे.

अहिल्यानगरमधील हर्षाली यादव हिची कहाणी 'नीट' पेपरफुटीचा सामान्य कुटुंबांवर किती भयानक परिणाम होतो, याचे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत मजुरी करणाऱ्या तिच्या वडिलांनी अतोनात कष्ट करून तिच्या कोचिंगचा खर्च पेलला होता. मात्र पेपरफुटीमुळे तिला पुन्हा परीक्षा द्यावी लागली. या दुसऱ्या प्रयत्नातही अपेक्षित गुण न मिळाल्याच्या धक्क्याने तिच्या वडिलांना थेट हृदयविकाराचा झटका आला. अशा कठीण परिस्थितीत आता हर्षालीला पुन्हा नव्याने परीक्षेची तयारी करायची असली तरी, कोचिंगसाठी पैसे कुठून आणायचे, हे मोठे आर्थिक संकट तिच्यासमोर आ वासून उभे राहिले आहे. अहिल्यानगरमधीलच निर्मिती साळवे या विद्यार्थिनीची अवस्थाही अशीच निराशाजनक आहे. तिने पहिल्या प्रयत्नात 'नीट' परीक्षेत ५०० हून अधिक गुण मिळवले होते. मात्र पेपरफुटीमुळे पुन्हा द्याव्या लागलेल्या परीक्षेत तिला केवळ २०० गुणांवर समाधान मानावे लागले. या अन्यायामुळे हताश झालेल्या निर्मितीने, "भविष्यात पुन्हा परीक्षा दिल्यास पेपर फुटणार नाही याची हमी कोण देणार?" असा उद्विग्न सवाल उपस्थित केला आहे. वारंवार परीक्षा द्याव्या लागल्याने विद्यार्थी आणि पालकांची मोठी मानसिक व आर्थिक कोंडी होत असून, सरकारने या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी तातडीने कठोर कायदा करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# पुलाच्या कामामुळे २७ जुलैपासून जड वाहनांना प्रवेशबंदी;पर्यायी मार्गाचा वापर अनिवार्य

जालना। प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ वरील कुंडलिका नदी येथे प्रमुख पुलाचे बांधकाम वेगाने सुरू असून या कामादरम्यान वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी तात्पुरता पर्यायी (डायव्हर्जन) मार्ग तयार करण्यात आला आहे. मात्र हा मार्ग केवळ हलक्या वाहनांसाठी सुरक्षित असल्याने २७ जुलै २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ किंवा पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत (यापैकी जे अगोदर होईल) जड व अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, जालना यांच्या प्रस्तावानुसार जिल्हादंडाधिकाऱ्यांनी मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ११५ अंतर्गत हा आदेश जारी केला आहे.

प्रशासनाने यापूर्वीही जड वाहनांना पर्यायी बायपास मार्गाचा वापर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र काही जड वाहने अद्यापही तात्पुरत्या मार्गावरून जात असल्याने रस्त्याचे नुकसान होत आहे. तसेच पुलाच्या बांधकामात अडथळे निर्माण होऊन अपघाताचा धोका वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित ठिकाणी प्रवेशबंदीचे फलक, बॅरिकेड्स आणि इतर वाहतूक नियंत्रणाच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. प्रशासनाने जड व अवजड वाहनांसाठी खालीलप्रमाणे पर्यायी मार्ग निश्चित केला आहे. पर्यायी मार्ग : जालनाकडून मंठा चौफुलीकडे जाणारी जड वाहतूक : अंबड चौफुली कालिका स्टील चौफुली कन्हैया नगर चौफुली मंठा चौफुली. मंठ्याकडून जालन्याकडे (अंबड चौफुलीकडे) जाणारी जड वाहतूक : मंठा चौफुली कन्हैया नगर चौफुली कालिका स्टील चौफुली अंबड चौफुली.जिल्हा प्रशासनाने सर्व जड व अवजड वाहनचालकांनी निर्धारित पर्यायी मार्गाचाच वापर करावा, असे आवाहन केले आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मुंबई पोलीस कायदा, १९५१ च्या कलम १३९ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

जाहिर प्रगटन

## तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २१४३/२०२५**
**आदित्य श्रीहरी धपाटे विरुद्ध**
**ग्रा. पं. कार्यालय, कळसंबर**

पहा

आदित्य श्रीहरी धपाटे, रा. कळसंबर ता. जि. बीड उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक आदित्य श्रीहरी धपाटे यांचा दिनांक ०८/०७/२००७ जी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालयान प कार्यालयात कळसंबर ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कळसब ता. जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/८/२०२६ ही आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

## तुळजाभवानी मंदिरविधींच्या खर्चावरून वाद

### १० वर्षांत ६ कोटी ३० लाख दक्षिणेचा अंदाज

तुळजापूर। प्रतिनिधी

तुळजाभवानी मंदिरातील बांधकाम निर्विघ्नपणे पार पडावे, यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या धार्मिक विधींवर होणाऱ्या खर्चावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. या विधींसाठी केवळ दक्षिणेवर दररोज १७ हजार ५०० रुपये खर्च करण्यात येणार असून, १० वर्षांत हा खर्च सुमारे ६ कोटी ३० लाख रुपयांपर्यंत जाणार असल्याने मंदिर प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

तहसीलदार माया माने यांच्या अध्यक्षतेखाली महंत आणि पुजारी मंडळाची बैठक झाली. मंदिरात सुरू असलेल्या निर्माण कार्याच्या पार्श्वभूमीवर वास्तूचे पावित्र्य कायम राहावे, काम निर्विघ्नपणे पूर्ण व्हावे, यासाठी विशेष धार्मिक पूजा आयोजित करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. मंदिरातील गणेश ओवरीत धार्मिक पुजा करण्यात येणार असून या साठी दररोज तब्बल १७ हजार ५०० रुपयांची दक्षिणा दिली जात आहे.

हा वार्षिक खर्च सुमारे ६३ लाख रुपये १० वर्षांचा अंदाजित खर्च ६ कोटी ३० लाख रुपये होणार आहे.

# पालकमंत्री यांच्या संकल्पनेतून प्रशासकीय सेवा आता थेट तुमच्या दारी

## जालना मित्र ठरतोय सुशासनाचा नवा आदर्श!

जालना। प्रतिनिधी

सरकारी कार्यालयातील खेटे आणि लांब रांगांतून नागरिकांची कायमची मुक्तता करण्यासाठी जालना जिल्हा प्रशासनाने पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या संकल्पनेतून 'जालना मित्र' हे नाविन्यपूर्ण घरपोच शासकीय सेवा पोर्टल नुकतेच सुरू केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणारा हा उपक्रम खऱ्या अथर्थाने 'शासन आपल्या दारी' ही संकल्पना साकारत आहे. घरपोच सेवेची सुलभ प्रक्रिया आता नागरिकांना कार्यालयात जाण्याची गरज नाही. ते मोबाईलवरून या पोर्टलवर जाऊन ग्रामस्तरीय उद्योजकाची अपॉइंटमेंट बूक करू शकतात. यानंतर नियुक्त थेट अर्जदाराच्या घरी येऊन कागदपत्रे घेतात. शासकीय शुल्का व्यतिरिक्त केवळ १०० रुपये घरपोच सेवा शुल्क आकारून अर्ज ऑनलाइन भरतात. अधिकाऱ्यांच्या डिजिटल स्वाक्षरीनंतर प्रमाणपत्र पुन्हा घरीच आणून दिले जाते. या



सुविधेमुळे विशेषतः दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील जनतेचा वेळ, श्रम व पैसा वाचत आहे.

आकडेवारीतून प्रशासनाची गती सध्या या पोर्टलद्वारे महसूल, पोलीस, कृषी आदी १३ विभागांच्या रेशन कार्ड, रहिवासी प्रमापणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, डिजिटल जीवन प्रमाणपत्र, चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र यांसारख्या २० जीवन आवश्यक सेवा घरपोच दिल्या जात आहेत. संपूर्ण जिल्ह्यात २०० अहोरात्र कार्यरत आहेत. अल्पावधीतच प्राप्त २,२१५ अर्जापैकी १,८९८ सेवा यशस्वीरित्या वितरित झाल्या आहेत. यासोबतच नागरिकांना माहिती व मार्गदर्शन मिळवण्यासाठी ७३८७९३८७७४ या क्रमांकावर २४७ व्हॉट्सअॅप चॅटबॉट सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. "हा उपक्रम प्रशासन रांगेतील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. नागरिकांचा अमूल्य वेळ व पैसा वाचावा आणि त्यांना सन्मानाने सेवा मिळाव्यात, हाच यामागचा मुख्य उद्देश आहे.' पारदर्शकता, वेग आणि तंत्रज्ञानाची सुरेख सांगड घालणारे हे 'जालना मॉडेल' संपूर्ण महाराष्ट्रासाठी निश्चितच दिशादर्शक ठरत आहे. सर्व नागरिकांनी आपले अर्ज 'जालना मित्र' या पोर्टलवरून सादर करुन, घरपोच सेवेचा लाभ घ्यावा असे नागरिकांना उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे यांनी आवाहन केले आहे.

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-**
**दिनांक - / /२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती सुमैय्या शाकेर सय्यद रा. पराडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुमैय्या शाकेर सय्यद | स्वतः | २४/११/२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- / /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

## तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड (दंड विभाग)

**दुरध्वनीक ०२४४७-२६२१४५**
e-mail.tahsildargeorai2@gmail.com
**क्र.२०२६/दंड/कावि-**
**दिनांक २०.०७.२०२६**

**प्रती,**
**१ पोलीस निरीक्षक, पो. स्टे गेवराई / चकलांबा तलवाडा**
**२. ग्राम महसूल अधिकारी गेवराई**
**विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.**

संदर्भः-१. शासन निर्णय क्रमांक जम्रना२५२५/ईऑ९९११ ८१)/प्र.क्र/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ २. अर्जदार पुजा विकास औताडे रा. डोंगरवाडी ता.धनसांगवी यांचा अर्ज दिनांक ३०.०६.२०२६ उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास सादर करण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ अर्जदार पुजा विकास औताडे रा. डोंगरवाडी ता. घनसांगवी यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा मुलगा शिव विकास औताडे यांचा जन्म दिनांक १३.०६.२०२२ रोजी उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामुळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे. करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रना२५ २५/ईऑ९९११८१)/प्र.क्र/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा मंडळ अधिकारी/ग्राम महसूल अधिकारी यांनी करून वस्तूतुस्थीतीदर्शक अहवाल चसादर करण्यात यावे.

स्वाक्षरीत
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

# हिंगोली जिल्ह्यात एसआयआरसाठी विशेष उपक्रम

## विद्यार्थी लिहिणार पालकांना पत्र, जिल्हाधिकाऱ्यांच्या सर्व शाळांना सूचना

हिंगोली। प्रतिनिधी

प्रिय आई, बाबा, पत्रास कारण की, माझे वय १८ वर्ष झाले नाही त्यामुळे मला मतदान करता येत नाही पण १८ वर्षानंतर मी आपल्या देशाची जबाबदार मतदार होईल. जिल्हात मतदान पुनरीक्षण कार्यक्रम सुरू असल्याचे मला शाळेत काळाले, तुम्ही देखील हा अर्ज भरून घ्या. त्यामुळे मला माझे नांव मतदार यादीत समाविष्ट करणे सोपे होईल अशा आशयाचे पत्र जिल्ह्यातील सुमारे १ लाख विद्यार्थी त्यांच्या पालकांना पाठविणार आहेत.हिंगोली जिल्ह्यात निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादी अद्ययावत करण्याच्या मोहिमेला व्यापक लोकसहभाग मिळावा, यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये विशेष जनजागृती




उपक्रम राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील शासकीय, अनुदानित व खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांमार्फत त्यांच्या पालकांना मतदार नोंदणी व पडताळणीबाबत जागृती करणारे पत्र पाठविण्यात येणार आहे. या पत्राद्वारे विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे महत्त्व समजावून सांगण्यात येणार असून, प्रत्येक कुटुंबाने बीएलओ यांना आवश्यक सहकार्य करून गणना प्रपत्र अचूक भरावे, आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत आणि मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांपर्यंत पोहोचणारा हा संदेश मतदार जनजागृतीसाठी प्रभावी ठरेल, असा विश्वास जिल्हाधिकारी गुप्ता यांनी व्यक्त केला आहे. या संदर्भात शिक्षण विभाग, सर्व मुख्याध्यापक आणि शिक्षकांना हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या असून, विद्यार्थ्यांमार्फत पालकांना पत्र पोहोचवून मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण अभियान यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले जाणार आहे. या उपक्रमात जिल्हयातील सुमारे १ लाख विद्यार्थी सहभागी होणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.

# दिवसा रेखी-रात्री घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## बीड एलसीबीची कामगिरी:एक अटक, सव्वापाच लाखांचा ऐवज हस्तगत

बीड । प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कामगिरी करत दिवसा रेखी करून रात्री घरफोडी करणाऱ्या एका कुख्यात टोळीचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून सुमारे ५,००,००० रुपये किमतीचा सोन्या-चांदीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पिंपळनेर आणि वडवणी पोलीस ठाण्याकडील एकूण दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

दिनांक ११.०७.२०२६ रोजी रात्रीच्या सुमारास पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. फिर्यादी जेवण करून झोपलेले असताना, रात्री लघवीसाठी घराबाहेर आले असता त्यांना बाजूच्या खोलीचा दरवाजा उघडा व कपाट अस्तव्यस्त पडलेले दिसले. कपाटातील सोन्याचे दागिने आणि अंगावरील सोन्याचे दागिने असा ऐवज अज्ञात चोरांनी लांबवला होता. या प्रकरणी पोलीस ठाणे पिंपळनेर येथे गुन्हा नोंदवण्यात आला होता.

तांत्रिक विश्लेषणातून आरोपी जेरबंद

गुन्ह्याची गंभीर दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहितीनुसार, हा गुन्हा खांडवी तांडा (ता. गेवराई) येथील गुन्हेगारांनी केल्याचे निष्पन्न झाले.



मुख्य आरोपी कृष्णा शेषा राव राठोड (रा. अंबुनाईक तांडा, गेवराई) हा सध्या सासरवाडीला (नाळवंडी तांडा) आल्याची माहिती मिळालद्ध्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. कसून चौकशी केली असता त्याने आपल्या इतर पाच साथीदारांसह हा गुन्हा केल्याची कबुली दिली.

उघडकीस आलेले गुन्हे व जप्त मुद्देमाल

आरोपीकडे केलेल्या सविस्तर चौकशीत त्याने खापरवाडी तांडा आणि वडवणी येथेही घरफोडी करून नगदी व सोने चोरल्याची कबुली दिली. त्यानुसार खालील गुन्हे उघडकीस आले आहेत:

पोलिसात नोंद: पोलीस ठाणे पिंपळनेर (गु.र.नं. २२४/२०२६ क. ३०४(२), ३०५(अ) बी.एन.एस.)

पोलिसात नोंद: पोलीस ठाणे वडवणी (गु.र.नं. १४१/२०२६ क. ३३१(४), ३०५(अ) बी.एन.एस.)

आरोपीकडून तब्बल तीन तोळे सोने आणि १० भार चांदी असा एकूण ५,००,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार शरद पवार करत आहेत.

पोलीस प्रशासनाची यशस्वी कामगिरी

सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, आणि सहा. पोलीस अधीक्षक बीड (व्यंकटराम) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि शेखर औटे, महेश विघ्ने, आणि अंमलदार विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, गोविंदा राख्ख, बबन सलगर, आशापाक सय्यद, चालक सिद्धेश्वर मांजरम, सुनील राठोड यांच्या पथकाने पार पाडली आहे.

# गहिनीनाथ गड-वामनभाऊ दिंडीच्या वारकऱ्यांसाठी आ.सुरेश धस यांची महापंगत

### हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

आष्टी । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पायी चालत पंढरपूरकडे येणाऱ्या वारकरी संप्रदायाच्या दिंड्यांमध्ये मराठवाड्यातील सर्वाधिक भाविकसंख्या आणि शिस्तप्रिय दिंडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र गहिनीनाथ गड-वामनभाऊ दिंडीसाठी यंदाही आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या वतीने भव्य महापंगतीचे आयोजन करण्यात आले. हजारो वारकरी भाविकांनी अत्यंत भक्तिभावाने महाप्रसादाचा लाभ घेत अन्नदानाच्या या सेवेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.





ह.भ.प. महंत विठ्ठल महाराज यांच्या अधिपत्याखाली दरवर्षी श्री क्षेत्र गहिनीनाथ गड, चिखली ते पंढरपूर असा पायी प्रवास करणाऱ्या या दिंडीचे पंढरपुरात आगमन झाल्यानंतर परंपरेप्रमाणे महापंगतीचा सोहळा पार पडला. महाप्रसादासाठी पुरी, बुंदी, बटाट्याची भाजी आणि मसालेभात असा रुचकर बेत करण्यात आला होता. महिला, ज्येष्ठ नागरिक, पुरुष, बालगोपाल अशा हजारो वारकरी भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने प्रसादाचा लाभ घेतला.

महापंगतीपूर्वी गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प. विठ्ठल महाराज यांचे आशीर्वाद घेण्यात आले. त्यानंतर अन्नपूर्णा देवीचे पूजन करून महापंगतीस प्रारंभ झाला. विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल! ◀◀ पान ३ वर

# प्रियदर्शनी प्राथमिक शाळा पाटोदा बाल वारकरी दिंडी सोहळा संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेच्या वतीने आषाढी एकादशीच्या निमित्ताने दि.२४जुलै २०२६ शुक्रवार रोजी शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांची बाल वारकरी दिंडी श्री क्षेत्र विठ्ठल गड संस्थान पाटोदा येथे काढण्यात आली यावेळी मु.अ. मोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख श्रीमती वीर मॅडम व सहकारी शिक्षक श्री माताडे सर, श्रीमती शेलार मॅडम, मदतनीस श्रीमती गायके मॅडम,श्रीमती लवांडे बाई या सर्वांच्या सहकार्य नियोजनातून या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.. यावेळी शाळेतील पालक बोराटे आज्जी ,श्रीमती तांदळे ताई यांनीही सहभाग घेतला..शाळेतून दिंडी सोहळ्याची सुरुवात झाली पाटोदा शहरातील मेन रोड मार्गे -माळे गल्ली-काळा हनुमान मंदिर -भीमनगर -पारगाव घुमरा रोड या रस्त्याने श्री क्षेत्र विठ्ठल गड संस्थान पाटोदा येथे पोहोचली..या वेळी काळा हनुमान मंदिर येथे श्री दादासाहेब घुमरे सर यांनी दिंडीचे स्वागत करून बाल वारकरी यांना बिस्किटे खाऊ वाटप करून दिंडीला शुभेच्छा दिल्या.श्री विठ्ठल गड वर पांडुरंगाचे दर्शन घेऊन विद्यार्थ्यांनी स्वादिष्ट वन भोजनचा आनंद घेतला.भोजनानंतर मु.अ. श्री मोरे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पंढरपूरच्या ◀◀ पान ३ वर



# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ माजलगावात एसएफआय व डीवायएफआय चे शैक्षणिक बंद पाळुन आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

दिल्ली येथील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमाराच्या निषेधार्थ माजलगाव शहरात स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया आणि डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया युवा संघटना यांच्या वतीने शाळा, कॉलेज बंद करून तीव्र निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व मोहन जाधव यांनी केले. यावेळी आंदोलकांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी केली.



आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवरील लाठीमाराचा निषेध व्यक्त करत, विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर बळाचा वापर करणे ही लोकशाहीविरोधी कृती असल्याचे आंदोलकांनी सांगितले. विद्यार्थ्यांना शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा घटनात्मक अधिकार असून, त्यांच्या आवाजाचे दमन करण्याचा प्रयत्न अस्वीकार्य असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. यावेळी मोहन जाधव म्हणाले की विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी ◀◀ पान ३ वर

# लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ सोमवारी विद्यार्थी जनक्रांती रॅली

## किल्ला मैदान ते जिल्हाधिकारी कार्यालय तिरंगा रॅली; विद्यार्थी, पालकांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग

बीड । प्रतिनिधी

दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानावर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ तसेच नीट (छएएढ) प्रश्नपत्रिका फुटीच्या विरोधात बीड येथे सोमवार, २७ जुलै रोजी भव्य विद्यार्थी-पालक जनक्रांती रॅली आयोजित करण्यात आली आहे. सकाळी ११ वाजता किल्ला मैदान (बलभीम-मिलिया महाविद्यालय परिसर) येथून रॅलीला प्रारंभ होणार आहे.



या रॅलीत बीड शहरातील शाळा, महाविद्यालये, स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी, पालक तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. सहभागी विद्यार्थी व पालक हातात तिरंगा ध्वज आणि महापुरुषांची छायाचित्रे घेऊन शांततेत रॅली काढणार आहेत. आयोजकांनी विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह रॅलीत सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

रॅलीच्या पार्श्वभूमीवर शासकीय विश्रामगृह येथे नियोजन बैठक घेण्यात आली. बैठकीत रॅलीचे नियोजन, शिस्त, मार्ग आणि कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पोहोचल्यानंतर नीट परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीच्या पार्श्वभूमीवर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण ◀◀ पान ३ वर

# लाठीहल्ला प्रकरण : अंबाजोगाईत वकील संघ आक्रमक,राष्ट्रपतींना निवेदन सादर



अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततामय आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ मा. सोनम वांगचुक यांच्या उपोषणस्थळी पोलिसांनी केलेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ अंबाजोगाईत वकील संघा'च्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदन महामहिम राष्ट्रपती यांच्या नावे अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले.या निवेदनात म्हटले आहे की, पेपर फुटी थांबवून संबधितांना कठोर शिक्षा द्यावी तसेच केंद्रीयमंत्री यांनी नैतिक जबाबदारी स्विकारून राजीनामा द्यावा. भारतीय शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणणाऱ्या व्यापक सुधारणा त्वरित लागू कराव्यात.

या निवेदनावर ऍड. अजय बुरांडे, ऍड. बाबुराव तिडके, ऍड. माणिक आदमाने, ऍड.माधव जाधव, ऍड.इस्माईल गवळी, ऍड.विलास लोखंडे, ऍड.शिवाजी कांबळे, ऍड.विजय चव्हाण, ड.दिलीप गोरे,ऍड. सचिन शेप यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# उपवर्गीकरणा विरोधातील २७ जुलैच्या मोर्चात बहुसंख्येने सहभागी व्हा -धनवे

बीड । प्रतिनिधी



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाई)चे प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात दि. २७ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोर्चात बहुसंख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन रिपाईचे सरचिटणीस अमोल (आबा) धनवे यांनी केले आहे.

धनवे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरण हा सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांना बाधा पोहोचवणारा विषय असून, याविरोधात एकजूट दाखविणे ही काळाची गरज आहे. समाजाच्या न्याय्य हक्कांच्या संरक्षणासाठी आयोजित करण्यात आलेल्या या मोर्चात सर्व आंबेडकरी अनुयायी, रिपाईचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक न्यायाची भूमिका मानणाऱ्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला बळ द्यावे. या मोर्चाच्या माध्यमातून समाजाची एकजूट आणि उपवर्गीकरणाविरोधातील ठाम भूमिका शासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही अमोल (आबा) धनवे यांनी स्पष्ट केले.

# बीडमध्ये बनावट कॉस्मॅटिक्सची विक्री: पोलिसांचा छापा, १ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील कारंजा रोडवरील अजिजपुरा भागात नामांकित कंपनीच्या नावाने बनावट सौंदर्य प्रसाधने (कॉस्मॅटिक्स) विक्री करणाऱ्या दुकानावर पोलिसांनी छापा टाकला आहे. या कारवाईत तब्बल १ लाख १ हजार ९२८ रुपये किमतीचा बनावट मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दुकानदाराविरुद्ध फसवणूक व कॉपीराइट कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एसएमसी टॉयलेटरीज कंपनीचे वरिष्ठ तपासणी अधिकारी रईसोदीन फजोदीन इनामदार (वय ५६, रा. वाकड, पुणे) यांनी यासंदर्भात तक्रार दिली आहे. गोरी ब्यूटी क्रीम अँड कॉस्मॅटिक्स कंपनीच्या बनावट उत्पादनांची विक्री होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

तक्रारीनुसार, कारंजा रोडवरील 'सबा बुरखा' दुकानाचे मालक रियाज खान जाबाज खान (वय ३१, रा. अजिजपुरा, बीड) हे मूळ कंपनीचा माल असल्याचे भासवून बनावट क्रीम, फेस वॉश आणि साबण विक्री करत असल्याचे आढळले. दुकानाची झडती घेतली असता गोरी ब्यूटी क्रीम, डे अँड नाईट क्रीम, फेस वॉश आणि बायोकोस सिरम असा एकूण १,०१,९२८ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

सदर कारवाई बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोलीस अंमलदार बावनकर, जाधव, शिंदे, पवार, राऊत आणि परजणे यांच्या पथकाने केली. या प्रकरणी आरोपी रियाज खान याच्यावर बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार तुळजा सपकाळ करत आहेत.


# सावता माळी परिसरातील स्मशानभूमी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ओसाड

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील बिंदूसरा नदीच्या तिरावर संत सावता माळी परिसरात माजी आमदार सुनील धांडे यांच्या स्थानिक विकास निधीतून स्व. विनय संचेती हिंदू सार्वजनिक स्मशानभूमी उभारण्यात आली होती. शहरातील नागरिकांना सन्मानाने अंत्यसंस्कार करता यावेत, या उद्देशाने लाखो रुपये खर्च करून ही सुविधा निर्माण करण्यात आली. मात्र, स्मशानभूमी उभारल्यानंतर नगरपालिकेने तिच्या देखभाल, संरक्षण आणि आवश्यक सुविधांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्यामुळे आज ही स्मशानभूमी ओसाड अवस्थेत पडून आहे.**

स्मशानभूमीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीज, अंतर्गत रस्ता, स्वच्छता, प्रकाशव्यवस्था, सुरक्षा तसेच नियमित देखभाल यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत. त्यामुळे नागरिकांनी या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्याऐवजी इतर ठिकाणांचा वापर करण्यास सुरुवात केली. परिणामी, लाखो रुपयांचा सार्वजनिक निधी खर्च करून उभारलेली ही स्मशानभूमी वापराअभावी दुर्लक्षित झाली आहे.

दरम्यान, स्मशानभूमी दीर्घकाळ वापरात नसल्याचा फायदा घेत या जागेवर भुमाफियांचे डोळे लागल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. परिसरात मोठ्या प्रमाणावर झाडाझुडपे वाढली असून काही ठिकाणी अतिक्रमण होत




स्मशान भूमी अतिक्रमणाच्या विळख्यात

असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी नगरपालिकेकडे तक्रारी केल्या. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, स्मशानभूमी ही सार्वजनिक मालमत्ता असून तिचे संरक्षण करणे आणि ती नागरिकांच्या वापरासाठी सक्षम ठेवणे ही स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी आहे. मात्र, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ही जागा अतिक्रमणाच्या विळख्यात जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांनी नगरपालिकेकडे स्मशानभूमीची तातडीने पाहणी करून अतिक्रमण हटवावे, संपूर्ण परिसराची स्वच्छता करावी, संरक्षण भिंत, वीज, पाणी, अंतर्गत रस्ते व प्रकाशव्यवस्था उपलब्ध करून स्मशानभूमी नागरिकांच्या वापरासाठी कार्यान्वित करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा सार्वजनिक निधीतून उभारलेली ही महत्त्वाची सुविधा कायमची नामशेष होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

बिंदूसरा नदीलगत आणि पुररेषेच्या हद्दीत असलेली स्वर्गीय विनय संचेती हिंदू स्मशानभूमी ही सार्वजनिक मालमत्ता असून तिचे संरक्षण करणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही स्मशानभूमी आज ओसाड पडली असून परिसरात अतिक्रमणाचा धोका वाढला आहे. सार्वजनिक जागा वापरात नसली की त्यावर भू-माफियांचे डोळे लागतात, अशी परिस्थिती येथे निर्माण होताना दिसत आहे. स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण वाढल्यास त्याचा परिणाम केवळ सार्वजनिक संपत्तीवरच नव्हे, तर नदीलगतच्या परिसरावरही होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने तातडीने ◀◀ पान ३ वर

# जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी नाव नोंदणीचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

जगातील सर्वात मोठ्या व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धेत सहभाग नोंदवून भारताचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी तरुणांना उपलब्ध झाली आहे. यासाठी इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७ च्या अंतर्गत जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. इच्छुकांनी https://www.skillindiadigital.gov.in या संकेतस्थळावर त्वरित नोंदणी करून आपला सहभाग निश्चित करावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणारे उमेदवार राष्ट्रीय प्रक्रियेतून पुढे जाऊन जागतिक स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करू शकतील.या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वयोमर्यादा हा मुख्य निकष आहे. ५६ विविध कौशल्य क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असावा. तसेच सायबर सिक्युरिटी, इंडस्ट्री ४.० आणि मेकाट्रॉनिक्स यांसारख्या टीम स्किल्ससाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ नंतरचा, तर स्वायत्त मोबाईल रोबोटिक्स आणि लँडस्केप गार्डनिंगसाठी १ जानेवारी २००६ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे. सर्व शासकीय व खाजगी आयटीआय, अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक महाविद्यालये, एमएसएमई टूल रूम्स आणि इतर शैक्षणिक संस्थांमधील पात्र तरुणांनी यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असेही कळविले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26